उर तो धडधडतो । हा जन पहा किति हळहळतो ॥

शौर्यः— ऋषिबाळांनों, ज्यापेक्षां रत्नकांतेचा इतका आग्रह आहे त्यापेक्षां कांहीं दिवस इकडे रहाण्याचें करा. मी इतांकडून तुम्ही इकडे असल्याचें वर्तमान सद्गुरु जांगील ऋषींस कळवितों.

हेमंतः— राजा, आम्हांस गुरुजींनीं रत्नकांतेस नवऱ्याचे स्वाधीन करण्याबरोबर निघून येण्याविषयीं आज्ञा केल्याप्रमाणें आम्हांस जाणें प्राप्त आहे.

भार्गवीः— मुली, तुला आतां काळजी करण्याचें मुळींच कारण नाहीं; हीं सर्व सज्जन मनुष्यें आहेत; तुला कांहींच त्रास पोंचूं देणार नाहींत. (वस्त्रानें रत्नकांतेचे डोळे पुसते.) अग वेडे, किती रडशील! (शौर्यसागरास) राजा रे, माझी प्राणासारखी ही रत्नकांता तुझ्या कुटुंबांत आणून सोडली आहे हिला तूं पोटच्या मुलीप्रमाणें सांभाळ करून हिचें कुशळवृत्त आम्हांस वारंवार कळवीत जा बरें. (सुशिलाबाईस) बाई, ही सात महिन्याची गरोदर आहे यासाठीं हिला तुम्ही फार जपत असा. (रत्नकांता भार्गवी आजीस मिठी मारते.)

रत्नः— आजी ग, तूं तरी आतां शरथ दादाबरोबर जाऊं नको; माझ्याबरोबर येथेंच रहा.

शरथः— रत्नकांते, सांगतों ऐक.

दिंडी.

येउं परतोनी आम्हि तूज न्याया ॥
करिल आज्ञा सद्गुरू तुज आणाया ॥
आतां राहीं तूं मुली राज्यभोगा ॥
मनीं नाणीं तूं परकि अशि जागा ॥

रत्नः— शरथदादा, तूं जाणारच तर गेल्यावर असें कर.

पद.

(बाळवधिली सेविल जावें या चाली.)

तातचरणीं ठेविला माथा ॥ सांग तूं माझें नमन समस्तां ॥
धाडेल केव्हां भेट ती आतां ॥ सखयांसि माझ्या सांग तूं जातां
सुखि आहे तुमची ही रत्नकांता ॥ कीं लोप असूंद्या सदैव चित्ता

सर्वहि तरुंला उदकासि देतां ॥ आळस नसुं देसेवेसि ताता ॥

शारथ:— तूं तिकडची मुळींच काळजी वागवूं नको.

भार्ग०— (रत्नकांतेस) नको गे माझे वेडे वारंवार डोळ्यांतून पाणी काढूं.

रत्न०— भाजीबाई, तूं वसंतारण्यांत गेल्यावर माझे आईस असें सांग.

चाल सदर.

मातेसि माझ्या सांग तूं आजी ॥ करुं नको म्हणुनी काळजी माझी ॥ इकडील वृत्ता कळवूनि सहजीं ॥ शेवटिं झाली आमुचि राजी ॥ माते० ॥

भार्ग०— बरें आहे सांगतें हां माझे लाडके.

पुरो०— ऋषिशिष्यांनों, जर तुम्हांस गेलेंच पाहिजे तर मग तुम्हांला कांहीं ही जाऊं देणार नाहीं. यासाठीं तुम्हीच हिचा निरोप घेऊन चला.

(शारथ, हेमंत व भार्गवी रत्नकांतेचा व राजाचा निरोप घेऊन जातात.)

पुरो०— (शौर्यसागरास) राजा, तुझी सून आज प्रथमच घरीं आली आहे यासाठीं सर्वत्र मिळून गुरुपादुकांच्या दर्शनासाठीं देवघरांत चला.

(सर्वत्र गुरुपादुकांच्या दर्शनास जातात.)

प्रवेश ३.

प्रधानकन्या कुसुमावती, पुरोहित कन्या रमा, सेनाधीश कन्या सुलोचना प्रवेश करितात.

रमा:— अग कुसुमावते, आजचें वाड्यांतील वर्तमान तुला समजलें काय!

कुसु०— रमे, आज मी सकाळपासून हा वेळपर्यंत एकसारखी कशिदा काढण्याचें काम करीत बसलें होतें. इतक्यांत तुझ्याकडून बोलावणें आल्यावर तशीच निघून इकडे आलें.

रमा:— अग कुसुमावते, आज धाकटे सरकार चतुर्भुज झाले हें तुला अजून समजलें नाहीं काय!

कुसु०— मला बाई तुमचा असला गूढार्थ मुळींच कळत नाहीं; तुम्हांला सांगणें आहे तर काय असेल तें स्पष्ट सांगा. मी आपली साधी माणूस आहें, मला तुमचे सर्केपणजे समजत नाहींत.

सुलो०— अग, सांगायाचें तें काय! धाकट्या सरकारची पत्नी आज-माहेराहून इकडे आली आहे.

कुसु०— म्हणजे! ही काय तुम्ही माझी थट्टा मांडली कीं काय?

रमा:— अग थट्टा कसली! खरोखरच धाकट्या सरकारची बायको माहेरीं होती ती गरोदर आहे म्हणून तिच्या बापानें तिला इकडे पाठवून दिली आहे.

कुसु०— चला बाई, तुमचा आपला सगळाच पचकळपणा.

सुलो०— सांगतों ऐकून तरी घे. तुला ठाऊकच असेल कीं, कांहीं दिवसां पूर्वी धाकटे सरकारची स्वारी वसंतारण्यांत राक्षसाचा नाश कर-ण्यास गेली होती तें.

कुसु०— होय गेले होते, तें मला माहित आहे.

सुलो०— त्या अरण्यांत आंगील ऋषीची कन्या रत्नकांता हिजबरोबर त्यांनीं विवाह लाविला.

कुसु०— असें काय? मग खरें पण ही गोष्ट आजपर्यंत गुप्त कशी राहि-ली?

सुलो०— अग, कशावरून कळणार! धाकट्या सरकारांनीं आपल्या इच्छे-प्रमाणें कार्य साधून घेतल्यावर स्वारी इकडे आली आणि स्वाशांनीं इकडे आल्यापासून नुसती तिची खबरसुद्धां घेतली नाहीं.

कुसु०— पुरुषांचीं हीं अशींच कर्मे, आपलें काम होई तोंपर्यंत कसे-गोड असतात. आणि एकदां आपल्या मनाप्रमाणें झालें मग अ-बलांना असें फांशीं पाडितात.

सुलो०— तें असो. पण आतां आपण वाड्यांत जाऊन धाकट्या सरका-रचे कुटुंबाची भेट घेऊं या.

रमा:— चला तर आतांच जाऊं.

(सुलोचना, कुसुमावती व रमा आयने महालांत रत्नकांता बसली होती तेथें जातात.)

प्रवेश ४

वाड्यांतील मोठा आयने महाल.

(रत्नकांता रत्नजडित पलंगावर बसते व दासी जवळ उभी राहाते.)

रत्न.— (दासीस) आज तिकडून आपल्यास येण्यास रात्र होणार असें मला सांगून गेले आहेत. मला तर त्यांचेवांचून मुळींच करमत नाहीं. कांहीं वेळ सारीपाटानें खेळावेंसें वाटतें पण सोबतीस आहे कोण!

दासी:— बाईसाहेब, सेनापतीची कन्या सुलोचना सारीपाटानें अशी उत्कृष्ट खेळते कीं सांगतां पुरवत नाहीं. फार काय सांगूं! - तिच्यासारखी आपल्या ह्या विश्वपुरी नगरांत खेळणारी दुसरी कोणी नसेल.

रत्न.— असें आहे तर तिला जाऊन मी बोलावीत आहें म्हणून घेऊन ये.

दासी:— आज्ञा बाईसाहेब. (दाराजवळ येते इतक्यांत सुलोचना, रमा, कुसुमावती प्रवेश करितात.)

रमा.— (दासीस) अग, वइनी साहेब आंत असतील तर आम्ही आलों म्हणून जाऊन सांग.

दासी.— मी आपल्यास बोलाविण्याकरतां येत होतें. (रत्नकांतेच्या महालांत प्रवेश करितात.)

रत्न.— (उठून) या बायांनों, इकडे अशा बसा.

सुलो.— वइनी साहेब, आम्हांस इतका मान देण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. कारण किती झालें तरी आम्ही आपल्या तैनातींतील मनुष्यें आहों.

रत्न.— असाल परंतु मी मात्र तुम्हांस तशा रीतीनें मानीत नाहीं. मी तुम्हांस माझ्या बहिणी प्रमाणें समजतें.

कुसु.— वइनी साहेब, आम्ही आमच्या मनांत एक प्रकारची आशा धरून आलों आहों तिची पूर्ती आपण केली पाहिजे.

रत्न.— सांगा सांगा तुमच्या मनांत काय इच्छा असेल ती.

सुलो.— वइनी साहेब, आपण आमच्या धनिणी झालां म्हणून आम्हांस अतिशय आनंद झाला आहे परंतु आपला लग्नस-

प्रारंभ आमचे देखत या नगरांत व्हावा तो झाला नाहीं यामुळें आमचे सर्व हेतु जिकडच्या तिकडे राहिले.

रत्न०— ईश्वरेच्छेनें सर्व गोष्टी घडून येतात त्यास मनुष्याचा इलाज नाहीं.

कुसु०— तें नाहीं तर नाहीं पण धाकट्या सरकारचें नांव तरी आपल्या मुखानें ऐकावें अशी इच्छा आहे ती पुरविणें आपल्या स्वाधीन आहे.

रत्न०— (लाजते व किंचित् हास्य मुखानें खालीं मान घालून बसते.)

सुलो०— वहनी साहेब, आम्ही आपल्याकडून आमचें इतकें तरी इच्छित पूर्ण करून घेतल्यावांचून रहाणार नाहीं.

रत्न०— बायांनो, आम्ही अरण्यांत रहाणारीं असल्यामुळें असला प्रकार आम्हास कधींही ठाऊक नाहीं; यासाठीं तुम्ही आधीं नांव घ्या म्हणजे मग बरें पडेल.

सुलो०— तसें नाहीं वयनी साहेब. तें अनुक्रमानेंच झालें पाहिजे.

रत्न०— (किंचित् लाजलेंसें करून) आतां येथें काय करावें! नांव जर घ्यावें तर बाई मनाला कसेंसेंच वाटतें. बरें जर न घ्यावें तर ह्या कांहीं धीर करणार नाहींत.

कुसु०— वयनी साहेब असें उगी बसून आम्ही सोडणार नाहीं, नांव घेतलेंच पाहिजे.

रत्न०— ऐका तर बाई, " आकाशांत तारा (लाजून थांबते.)

रमा— असें काय वयनी बाई, नोडल्या तोडल्यासारखें करतां?

रत्न०— " आकाशांत तारा त्यांत जसा चंद्र आणि चंद्रमुख महाराज भूमंडळीं इंद्र".

(सर्व स्त्रिया मोठ्यानें हंसतात व बाकी स्त्रियाही आपापल्या पतीचीं नांवें घेतात.)

सुलो०— वयनी बाई, आम्हांस आतां फार रात्र झाली घरचीं रागें भरतील यासाठीं आज्ञा मागतों.

रत्न०— काय बाई, तुम्ही मला निरंतर जवळ असावें असें वाटतें

पण काय करणार! तुम्ही परस्वाधीन मनुष्यें. असो. अशाच बारंवार येत असा म्हणजे झालें.

कुसु॰— वयनी साहेब, आमच्या व आपल्या जन्माच्या गांठी पडल्या आहेत आणि आपण आमच्या धनिणी आहांत तेव्हां आम्हांस पायांनी नाहीं डोक्यानें येणें भाग आहे.

(सुलोचना, कुसुमावती, रमा रत्नकांतेचा निरोप घेऊन जातात.)

(चंद्रमुख प्रवेश करितो.)

चंद्र॰— (आपणांत) काय पहा परमेश्वराच्या लिखिताचा घटितार्थ आहे तो! विचार केला तर मति गुंग होऊन जाते. मी अरण्यांत जावें, तिकडे त्या ऋषि आत्मजेची व माझी दृष्टादृष्ट व्हावी ती अशी कीं, तिणें मला पाहिल्यापासून तिला व तिला मी पाहिल्यापासून मला, उभयांतसही एक क्षण चैन पडेनासें झालें. (इकडे तिकडे फिरतो व इतक्यांत विदुषक प्रवेश करितो.)

विदु॰— (कपाळावर हात मारून) काय रे मी फुटक्या नशिबाचा कारटा जन्मास आलों! मला सुख कसलें तें जन्मांतही माहित नाहीं! अरे मला कांहीं सुख होईल म्हणून मी ह्या चंद्रमुखाची मैत्री केली. उपयोग काय! याणें माझी उलटी पाठ पुरविली; या चंद्रमुखानें माझा हा सगळा जन्म अरण्यांतील दुःखाचीं कामें करण्याकडे घालविला. बरें. अरण्यांत जाऊन घर म्हणून घराकडे गेलों तर तिणें आमचा असा काय पिच्छा पुरविला आहे कीं सांगतां पुरवत नाहीं. ती मला अरे मेल्याशिवाय दुसरा चांगला शद्ब बोलतच नाहीं. आज ती म्हणत होती वाड्यांत नव्या बाईसाहेबांस भेटायाला जाणार यासाठीं आपल्यास आंगावर घालण्यास दागिने व लुगडीं आणून द्या. काय कर्मभोग सांगावा! सी हो हिला कोठले दागिने आणून द्यावे! मी तिला म्हटलें तुला दागिने आणून देण्यासाठीं काय कोणाचें घर फोडूं? मग काय विचारतां! तिला मस्तकावरती तेल पडल्या-

सारखें झालें आणि ती चांडाळीण विवशीसारखी जबाऊ पेट-तें लांकूड घेऊन रे देवा माझे पाठीस लागली; शेवटीं तोंड घे-ऊन इकडे पळून आलों. (पुनः कपाळावर हात मारून) एवं-च प्रारब्ध माझें दुसरें कांहीं नाहीं!

चंद्र॰ (विदुषकाकडे पाहून) काय हे माझे वक्रदंत मित्र खालीं मान करून मोठ्या काळजींत बसले आहेत. स्वारीला कसली बुवा काळजी लागली असेल ती असो. (विदुषकास जवळ जा-ऊन हालवितो.) वक्रदंता अरे वक्रदंता, असा दुःखित कां बस-लास?

विदु॰ (रडत रडत) गड्या, मला आतां हा जन्म नकोसा होऊन गे-ला आहे. फार काय सांगूं! तुझी चमाझी ही शेवटचीच भेट.

चंद्र॰ अरे पण झालें काय तुला इतकें करवादायाला!

विदु॰ व्हायाचें काय माझें कर्म। अरे, तिणें मला इतका त्रास दि-ला आहे कीं सांगतां पुरवत नाहीं. विशेष काय सांगूं! आज ती जबाऊ पेटनें धगधगीत लांकूड घेऊन मला मारण्यासाठीं माझे पाठीस लागली. मीं जो पळालों तो समोर इकडे आलों, ती माणिक चौकापर्यंत माझ्या पाठीस लागून आली होती. आतां मी कांहीं परत घरीं जाणार नाहीं.

चंद्र॰ (हांसून) किती तरी भित्रा बुवा हा! दीड दमडीची बायको ती काय आणि तिला हा भितो हें काय!

विदु॰ (वर मान करून) काय म्हणतोस गड्या दीड दमडी-ची बायको! तर मग त्या वसंतारण्यांत त्या भटाचे पोरगी-साठीं इतका लंपट होऊन कां राहिला होतास! त्या दीड दम-डीच्या स्त्रियेकरितांच ना!

चंद्र॰ याणें तर मला बुवा बोलतां बोलतां पकडलें. (विदुषकास) तें राहूं दे आतां, तूं कांहीं काळजी करूं नको. मी वहिनीस-आतांच बोलावून आणून तिची समजूत करून तुला जन्म-वर तिणें काडी इतका त्रास देऊं नये अशी तजवीज करून-सोडतों. मग झालें ना! (विदुषकाचे पाटीवर हात थोपटतो.)

विदु॰ (हात जोडून) मित्रा, एवढें जर काम करिशील तर माझे-

वर तुझे डोंगराएवढे उपकार होतील.

चंद्र०— बरें आहे जा तूं आतां, रात्र फार झाली. असो. आतां प्रियेच्या मंदिराकडे जावें. (चारी दिशांकडे पाहून)

पद.

(मलिन वस्त्र परिधान करिलसे या चालीं.)

किति मेघांनीं आक्रमिला हा भाग उत्तरेचा ॥
झांकुनि जाउनि न दिसे कोठें गणही तारांचा ॥ धृ०॥
चकचकाट हा मधुनी मधुनी होतो चपळेचा ॥
बघुनि नयन हे जाति दिपोनी यत्न न नेत्रांचा ॥ कि०
विरही जन ते व्याकुळ होती वातही थंडीचा ॥
आंगावरती येतां वाढे काम अती साचा ॥ किति० ॥३

(रत्नकांतेच्या आयने महालाजवळ येतो.) काय चमत्कार आहे! मी फिरत फिरत हा माझ्या सखीच्या आयने महालाजवळ येऊन पोंचलों. (महालांत पाहून) ही माझी प्रिया हातांत सेला घेऊन त्याचेवर माझें नांव कोरीत आहे. असो. आतां आपणांत जावें. (मंदिरांत प्रवेश करितो.)

(रत्नकांता चंद्रमुखास पाहून एकीकडे पलंगाचे बाजूस उभी रहाते.)

रत्न०— हें असलें काय बाई अचाट करणें कोण जाणे! येण्याचे पूर्वी दासीकडून सूचना देण्याची सुद्धां गरज नाहींसें वाटतें. आमचें बायकांचें जिणें, एखादे वेळीं अव्यवस्थेत अंतरगृहांत असण्याचा प्रसंग असतो. बरें म्हणून बरें नाहीं पेक्षां किती बरें बाईट कृति ही.

चंद्र०— (रत्नकांतेच्या हातास धरून) वाहवारे मोठी लाजाळु. (असें म्हणून हनुवटीस हात लावून पलंगावर आणून बसवितो.)

रत्न०— हें पण काय बाई! जशी काय सगळी लाज सोडून दिली आहे.

चंद्र०— कमलाक्षे, तुझ्या म्हणण्याप्रमाणें तसेंच कां होईना! आम्ही आपली सर्व लज्जा सोडून निर्लज्ज बनलों आहों. पण

हा सर्व निर्लज्जपणा आपल्या पुरताच हो.

रत्न०— ठाऊक आहे मला असला लुब्रेपणा मात्र बरा करितां येतो. बरें प्राणनाथ, आपण आज मला आज येते वेळीं चंद्रहार आणतों असें कबूल केलें होतें त्याप्रमाणें चंद्रहार आणिला काय?

चंद्र०— जिवलगे, तुला चंद्रहाराला काय कमती? शेंकडों चंद्रहार तुझ्यावरून ओंवाळून टांकीन.

रत्न०— महाराज, या गप्पा एकीकडे असूं द्या. हार आणिला असेल तर द्या, नाहीं तर साफ मिळत नाहीं म्हणून सांगा. उगी आशा तरी कशास पाहिजे?

चंद्र०— सखे, तुला खरें सांगूं! चंद्रहार आणितों म्हणून तुला सांगितलें आणि तुझ्या मंदिरांतून बाहेर पडलों तों लागलाच कांहीं जरुरीचे कारणासाठीं तसाच निघून कचेरीस गेलों. तिकडे ह्या वेळपर्यंत राहून सर्व काम आटपलें आणि वडील मातोश्रीचें दर्शन घेऊन परस्पर तुझे मंदिरांत आलों. चारुगात्रे, आज जरी चंद्रहार आणण्यास विसरलों तरी आधीं उठण्याबरोबर हें काम.

रत्न०— (पलंगावरून उठून दूर उभी रहाते.) बरोबरच आहे हार आणण्याला कशाला स्मरण होईल. प्रत्यक्ष माझी ज्यांना विसर पडली त्यांना चंद्रहार आणण्याची विसर कां पडणार नाहीं?

चंद्र०— पद.

(नको सुंदरि धरुं शंका. या चालीं.)

प्रियसखये त्या समया॥ आणुंनको तूं हृदया॥
आठवितां मज विस्मय होतो॥ बाढे खेद कि या॥प्रि०॥
पाहिलि जेव्हां तुजला॥ झाला भ्रम बहु मजला॥
अभ्रूच्या भीतीला॥ बोलिलों कूशंकांला॥
जारिणि हें म्हणण्याला॥ सुंदरि ह्या सरसरला॥
दूषविलें तुज नाना परि परि   आतां करिं तूं दया॥प्रि०

(रत्नकांतेस धरून मांडीवर बसवितो.) प्रिये, सांगतों ऐक.

पद.

(भूमि जल तेज पवमान नभ पांचही. याचाली.)

आजवरि तूज बहु दोष घडविला मी ॥
परि सखे मनिं न दुःख धरिं तूं लोभ ठेवीं प्रिये जन्मवरि संग्रहीं ॥ आज साक्षी ईश करुनि कथितों ॥
मुळीं नाहिं नाहीं सखे सूख तुज दिलें ॥
मला तेंच बहु जाचलें ॥ आजवरि. ॥१॥

म्हणून प्रिये, त्या गोष्टीची वारंवार आठवण करून विझत आलेल्या अग्नीला फुंक मारून पेटवूं नको.

रत्न.— प्राणनाथ, मी सहजीं थट्टेनें असें म्हटलें. मला कांहीं याचें इतकें आपल्यास वाईट वाटेल असें मुळींच वाटलें नव्हतें (बोटें मोडून) कसली दुष्ट चांडाळीण मी, बोलून प्राणनाथाच्या अंतःकरणास विदारिलें. (नेत्रांतून पाणी काढते.)

चंद्र.— (रत्नकांतेचे डोळे पुसतो.) प्राणसखे, हें काय तूं वेडीबिडी नाहींस ना झालीस! बोलण्यावरून बोलणें येतें. म्हणून त्याजबद्दल आपल्या मनाला दुःख देऊन परिणाम कसा लागेल? खुळी कुठली प्रिये, झाल्या गोष्टीला इलाज नाहीं. परंतु मी जगन्नियंत्या परमेश्वराकडे वारंवार हात जोडून इतकेंच मागतों कीं, याउपर तुझा व माझा एकक्षणभरसुद्धां त्यापेक्षां वियोग घडवूं नये.

रत्न.— प्राणनाथ, माझेंही त्या जगदीशाकडे हेंच मागणें आहे. (हात जोडून) देवा, ज्यापेक्षां तूंच आमची उभयतांची गांठ घातली आहेस त्यापेक्षां तूंच आमचें उभयतांचें कल्याण करण्यास समर्थ आहेस. प्राणनाथ, आपल्यासही मी त्या प्रसंगाच्या वेळीं नाना तऱ्हेच्या वाग्बाणांनीं ताडण केलें त्याबद्दल या दीन दासीवरील राग टांकून लोभ ठेवा.

पद.

(बहुत छळिलें नाथा. याचाली.)

सहजिं अन्याय झाला परि तें दुःख वाटतें ॥
जोडितसें पाणी ॥ दयेला मज द्याया आतां ना-

या देउनियां आलिंगनाला ॥
कीं सारेंचि अर्पुनि या सौख्य त्वरेतें ॥ सहजि० ॥१॥

चंद्र० — सखे, पहा तुला सांगतों. कोळसा जितका जितका उगळावा तितकें तितकें काळेंच बाहेर पडणार. तसेंच गेल्या गोष्टीची जितकी जितकी आठवण करावी तितकें तितकें वाईटच वाटणार, म्हणून तें आतां मनांत मुळींच आणूं नको.

रत्न० — सगळें खरें प्राणनाथ; पण उद्यां तरी रत्नहार खचित मिळणार ना !

चंद्र० — हो हो खचित म्हणून विचारतेस काय! उद्यां उठण्याबरोबर प्रथम तुला रत्नहार आणून देण्याचें काम, मग दुसरें. पण प्रिये, एक सारखेंचा. (चुंबन घेतो.) सखे, रात्र फार झाली नाहीं काय !

रत्न० — झाली तर झाली. उद्यांक उठण्यास उशीर होईल इतकेंच — ना !

चंद्र० — तुला काय ! पण आम्हास सूर्योदयाबरोबर राज्यसूत्र हांकण्यासाठीं कचेरीला गेलें पाहिजे.

रत्न० — कुठलें तरी निमित्त काढून झोंपायाचें झालें.

चंद्र० — प्रिये, मला झोंपायाचें नाहीं. कांहीं निकडीच्या कामासाठीं आतांच शहरांत गेलें पाहिजे म्हणून आतां जायाला निरोप दे.

रत्न० — माहित आहे मला. कसें तरी निसटून जाऊन कोठें तरी मिजास मारायाची, दुसरें काय !

चंद्र० — नाहीं नाहीं सखे, तुझ्यावांचून इतर स्त्रिया मला बहिणी, मातोश्रीप्रमाणें आहेत.

रत्न० — प्राणनाथ, मला काय ठाऊक नाहीं ! पण मी उगीच थट्टेनें म्हटलें. आतां पुनः लवकर आलें पाहिजे.

चंद्र० — हो हो, जाऊन काम आटपतांच तसाच परत येतों.

रत्न० — (दासीस.) अग, विडेबिडे द्यायाचें काय स्मरतें काय?

चंद्र० — पण आम्हाला तिचे हातचा नको झाला तर!

रत्न० — मग मी माझे हातचा करून देण्यास कोठें कमती आहे?

(रत्नकांता चंद्रमुखास त्रयोदश गुणी सुंदर विडा करून दे-
ते. चंद्रमुख निघून जातो व रत्नकांता पलंगावर शयन करते.)
पडदा पडतो.

अंक पांचवा समास.

अंक ६.

प्रवेश १.

रत्नपुरीनगर.

(सुहास्यराजाचा सेवक प्रवेश करितो.)

सेवक.— राजाच्या आज्ञेप्रमाणें रतिप्रिया बाईसाहेब नाहींशा झाल्यापासून वर्षानुवर्ष गांवांत दंवडी पिटण्याविषयीं हुकूम झाल्यावरून आज पंधरा वर्षे सालोसाल दंवडी पिटीत आहें पण अजून कोणास पत्ता लागत नाहीं. आतां सोळाव्या वर्षाची दंवडी पिटतों. (थांबून.) तिचा कोणास शोध लागेल तर तावडतोब राजवाड्यांत कळवावें म्हणून मी बहुतेक सर्व शहरांत दंवडी पिटून कळविलें. आतां या शहराच्या मध्यभागीं आलों, इकडे दंवडी पिटून सर्व लोकांस जाहीर करावें.

दिंडी.

राजपत्नी रतिप्रिया पूजनासी ॥
विपिनिं गेली टाकुन समस्तांसी ॥
परि नाहींशी झालि कशी तेथें ॥
म्हणुनि सुचवीतों आज समस्तांतें ॥

(मोठ्यानें) हे नगरवासी जनांनों, धाकट्या बाईसाहेब केसरी डोंगरांतील देवीच्या पूजेसाठीं गेल्या होत्या त्या बाहेरील देवतांची पूजा करून देवी मंदिरांत गेल्यावर आंतल्या आंत नाहींशा झाल्या, त्यास आज सोळा वर्षे होत आलीं पण अजून तिचा पत्ता नाहीं. जर कोणास रतिप्रिया बाईसाहेबांचा कोणत्याही प्रकारें कसाही मागमूस लागला तर लागलीच वाड्यांत येऊन वर्दी द्यावी. जो रतिप्रिया बाईसाहेबांचा पत्ता लावून देईल त्यास सरकार मोठ्या पदवीस चढवितील अशी प्रधानजीची आज्ञा आहे. (थांबून आपणांत) राजाच्या आज्ञेप्रमाणें सर्व शहरभर दंवडी पिटून झाली. आतां आपल्यास स्वगृहीं जाण्यास कांहीं हरकत नाहीं. (निघून जातो)

(सुहास्यराज प्रवेश करितो.)

सुदा० — (रतिप्रियेस आठवून) माझे प्रियेस नाहींसें झाल्यावर आज सोळा वर्षे होत आलीं पण इतक्या मुदतींत तिचा कोठें मागमूस लागत नाहीं. कोठून लागणार; जी वस्तु जगांत नाहीं ती दिसेल तरी कशी! अरेरे।

पद.

(नाहिं झाले षण्मास मला • या चालीं.)

षष्ठादश संवत्सर जाति होउनी ॥
काय असा दुष्ट योग येत घडवुनी ॥ धृ०॥
काय माझा हा कर्मभोग पाठिं लागला ॥
काय पूर्व जन्मिं दंपत्यांसि बिघड घातला ॥
काय पुत्रपित्यासि कलह करुनि भेद आणिला ॥
हें दुःख मज मनीं ॥ षष्ठा० ॥ १॥

देवा, काय माझ्या प्रियेची दशा झाली असेल ती असो! ज्या माझ्या सखीस मंदिरांतून बाहेर पडणें स्वप्नांतसुद्धां ठाऊक नाहीं तिच्यावरती असा दुःख डोंगराचा प्रहार तूं करावास ना। हरहर! परमेश्वरा तुला हें तुला कसें रे पुरवलें! नारायणा! – तुझ्या मनांत जर तिचा घातच करावा असें होतें तर प्रथम माझा नाश करून मग तिचा केला असतास तर पुरवलें असतें. अहाहा! प्रियेच्या गुणांची आठवण झाली म्हणजे माझी छाती फुटून काळजाचे तुकडे तुकडे उडतात. (थांबून.) मला माझी प्रिया नाहींशी झाल्याबद्दल माझे मनांत अनेक रीतीनें तरंग उठतात. एखादे वेळीं असें वाटतें कीं, तिच्या सवतीनें हें काम केलें असावें परंतु त्याउभतांचा अप्रतिम लोभ होता म्हणून ही कल्पना खोटी असें वाटतें. प्राणसखे,

शार्दूल.

घेत्तां घांस मुखीं मली स्मरसि तूं तैसेंच त्यासवतिला
प्रीये प्रीयसखे कधींहि नरुचे तीच्याविणें सर्वदा॥
भ्रांती ही मनिंची मनीं खुपतसे वाटे जरी तीरवरी॥
ऐशी ही कृति त्यास तीस नरुचे झाली गती यापरी॥

प्राणसखे, जितकी जितकी तुझ्या सद्गुणांची मला आठवण हो-

ते तितकें तितकें मला :: जास्त जास्त वाईट वाटतें. मृगाक्षे.

श्लोक.

तुज पळहि गे माझ्यावीणें नगमे मंदिरिं त्या ॥
वियोग मजही तूझा वाटे सखये दुःसह या ॥
उशिर जरि गे होतां मातें बघशी वाट अधीं ॥
मग तूं मजलायेण्यासाठीं करिशी यत्न तधीं ॥

प्रिये, मला तुझा पळसुध्दां वियोग कधी तो ठाऊक नाहीं, तो मी तुझ्यावांचून हें सर्व आयुष्य कसें रे काढूं! (दुःखानें) सखे, मी तरि आतां कशाला प्राण ठेवूं! (आपणांत) कोणत्याही उपायांनीं आपणही आपल्या देहाचा शेवट करून घ्यावा म्हणजे झालें

(पडद्यांत.)

ओंवी.

परिस राजा सत्यवचना ॥ सुखी आहे तव अंगना ॥
नको करूं आत्महनना ॥ त्वरित भेटेल तुजसती ॥

सुहा. (ऐकलेंसें करून) या बाजूनें हा गंभीर ध्वनि कोणाचा ऐकूं येतो. हा ध्वनि मला असें सुचवितो कीं माझी प्रिया मला लौकरच भेटेल. छे:! असें कसें होईल? मनीं वसे तें स्वप्नीं दिसे तशांतलाच हा प्रकार आहे. जिचा मी आज सोळा वर्षें सर्व भवनांत शोध केला पण पत्ता लागेना तिची मला भेट कोठून होणार!

(पडद्यांत.)

पद.

(मुला सांग नृपतीस संदेश माझा. या चालीं.)

अरे ऐक भूपती तुं आकाशवाणी ॥
कासया करिसि दुःखकरणी ॥ धृ० ॥
सत्यसत्य भूतळीं ॥ अचिंत्त तव दुर्बळी ॥
कर्मभोग भोगणें ॥ तीस पाहीं ॥
सूख दुःख जें असे ॥ तें तें घडुन येतसे ॥
त्यासि यत्न बुद्धि नसे ॥ विचार तूं करीं ॥ अरे० ॥

मुहा० काय ही आकाशवाणी मला सांगते, माझी प्रिया मृतत्वावर मुखरूप आहे म्हणून! असें जर असेल तर हें एक दुःखांत सुख च समजलें पाहिजे आतां ह्या आकाशवाणीवर भरंवसा ठेवून स्वस्थ असावें.

साकी.

प्रीतीनें मी पाळिलि तिजशीं देउनि इच्छित सारें ॥
तशीच देवा रक्षण करिं ती मम प्राणावत सखि रे ॥
कोमल तनुची जी ॥ चिंता वाहिल बहु माझी ॥

(चित्रग्रीव गंधर्व रत्नकांतेस खांद्यावर घेऊन प्रवेश करिता.)

चित्र० नारद आज्ञेप्रमाणें रत्नकांता आपल्या रत्नजडित पलंगावर निजलेली संधि पाहून युक्तीनें तिच्यावर मोहनास्त्राची योजना करून गुप्तरूपानें तिच्या मंदिरांत प्रवेश केला आणि हिला घेऊन तर इकडे आलोंच. आतां सुहास्यराजांची स्वारी कोठें असेल तिकडे हिला ठेविली म्हणजे मी या कामगिरींतून सुटलों. (सुहास्यराजाकडे पाहून) अरे, हा राजा तर इकडेसच दीर्घ शोक करीत बसला आहे तर आतां असें करावें याला चीड येण्यासारखें मोठ्यानें कांहीं तरी भाषण करावें, म्हणजे हा आह्मेबरोबर सहज युद्धास तयार होईल. मग युद्धप्रसंग होत असतांना याच्यावर मोहनास्त्र सोडून याला मूर्च्छित पाडून रत्नकांतेस येथेंच टेवून आपण चालतें व्हावें म्हणजे झालें. (मोठ्यानें) अरे राजा, बायकांसारखें रडत बसण्यास तुला कांहीं शरम वाटत नाहीं!

मुहा० मी माझ्या प्रियेच्या विरहाग्नीनें भाजून गेलों असतांना दुःखावरती डाग दिल्यासारखा मला दूषण कोण देतो आहे? (चित्रग्रिवाकडे पाहून) हा काय चमत्कार! या पुरुषानें आपल्या खांद्यावर ही कोण स्त्री घेतली आहे! (डोकावून पाहून) ही स्त्री निद्रेच्या भरांत आहे मला वाटतें या सर्व प्रकारावरून ही स्त्री कांहीं याची नव्हे, याणें कोणाची तरी परकी पुरुषाला फसवून हिला आणिलेली आहे यांत संशय नाहीं. (चित्रग्रिवास) मूर्खा, गर्वानें फुगून गेला आ-

हेस होय! चोरा, ही अबला कोणाची घेऊन इकडे पळून आलास! चांडाळा, हिला आणून हिच्या सासूसासऱ्यांस व आईबापांस दुःख देऊं पहातोस काय! पण अधमा हिच्या सुकृतानें व तुझ्या दुष्कृतानें तूं माझे सपाट्यांत मिळालेला आहेस. मुकाट्यानें या मुलीला इकडे ठेवून प्राण वांचविण्यासाठीं पळून जा.

चित्र० (मनांत) मी तरी हेंच इच्छितो. पण एकदम निघून जाणें उपयोगीं नाहीं. यासाठीं याच्याबरोबर थोडा बहुत युद्धसंग्राम करून मनांत योजिल्याप्रमाणें रत्नकांतेवरील मोहनास्त्र काढूनें अंतराळींच नाहींसें व्हावें. म्हणजे नारदस्वामींनी आज्ञा केल्या प्रमाणें पूर्ण कामगिरी बजाविल्यासारखें होईल. - (राजास) अरे, मनास येईल त्याप्रमाणें या स्त्रीची व्यवस्था करण्यास मी मुकत्यार आहे. दुसऱ्याचे घरची तुला काळजी कशाला पाहिजे!

सुहा० मूर्खा, जाणून बुजून मी तुला अनीति करूं देईन अशी तुला खात्री वाटते काय! चांडाळा, गपचुप या मुलीला इकडे ठेवून चालताहो, नाहीं तर फुकट प्राणास मुकशील.

चित्र० अरे रडतोंड्या, तुझ्या अंगीं पराक्रम कितपत आहे तो तूं जो जो झोंक करीत आहेस त्यावरून मी पक्का जाणला आहे.

सुहा० (मनांत) आतां उगीच याला खिळवून उपयोग नाहीं.

(चित्रग्रिवाचें व राजाचें एक मुहूर्तपर्यंत मल्लयुद्ध होतें. - चित्रग्रीव राजावरती मोहनास्त्र टाकतो. - तेणेंकरून राजा मूर्च्छित पडतो.)

चित्र० आतां ही संधि आपलें कार्य शेवटास नेण्यास फार चांगली आहे. यासाठीं रत्नकांतेवरचें मोहनास्त्र काढून घेऊन हिला मोकळी केली म्हणजे ही अरण्यांत आल्याच्या दुःखानें शोक करील व तिचा आक्रोश ऐकून राजा सावध होईल.

(रत्नकांतेवरील मोहनास्त्र काढून गंधर्व पुराला निघून जातो.)

रत्न० (चोहोंकडे पाहून) हा काय चमत्कार आहे! मी स्व-

भांत तर नाहीं ना! प्राणनाथ गेल्यावर मी माझ्या आयनेमहालांत निजलें होतें ती इकडे कोठें आलें! (न्याहाळून पाहून) अरे देवा! हें तर सगळेंच चोहोंकडे निबीड अरण्य आहे. (घाबरून) हाय हाय! नारायणा, हा कांहीं तरी माझ्यावर विपरीत प्रसंग दिसतो. (दासीस हांक मारते) अग कळावंते, अग कळावंते. अरेरे! दासी सुद्धां याप्रसंगीं इकडे नाहीं ना! शिव शिव! नारायणा, आतां मात्र माझ्या प्रारब्धाची शिकस्त झाली. देवा! माझे प्राणनाथ मी पलंगावर नाहींशी पाहून मला जारिणी हें दूषण खचित लावणार! (चंद्रमुखास ओळखून) प्राणनाथ! आपण संकेताप्रमाणें मंदिरांत आल्यावर मी नाहींशी पाहून मनांत काय बरें समजाल!

पद.

(शशि कुळभूषण सदया. या चाली.)

महि कुळमंडित सखया॥ जिवलग प्राणविसांव्या॥
करिल कशी ही जाया॥ नाहीं उपाय तया॥ धृ०॥१
वरिली मी तव काया॥ बहु आवडिनें सख्या या॥
विधि नशिबीं फुटक्या ह्या॥ आणित ह्या समया॥२
अति आशा मज होती॥ राहिलि शेवटीं मनिं ती॥
कवणासी सांगुं स्थिती॥ वाटे मज खंती॥३॥
म्हणाल जारिणी मजला॥ खातें हें चित्ताला॥
आणि तुमच्या स्नेहाला॥ अंतर हो पडला॥४॥

प्राणनाथ तुमच्या वांचून मी कशी बरें वांचेन.

शेवटिं ही वीनंती॥ लोभ असो या चित्तीं॥
मरप्राणाचि आहुती॥ देतें चरणाप्रती॥

प्राणनाथ, माझ्याच्यानें हा आपला वियोग सहन करवत नाहीं. आणि आपल्यावांचून मी वांचून तरी उपयोग कोणता?

सुहा०— (मूर्च्छना सावरून) कोठें गेला तो चांडाळ. (रत्नकांतेकडे पाहून) या स्त्रियेला टाकून तो मायावी पळून गेला वाटतें. असो. ही स्त्री फार शोक करीत आहे, हिला हें सर्व वर्तमान सांगून हिचें सांत्वन करावें. (रत्नकांतेस) मुली,

तूं शोक करूं नको. मी सांगतों हें ऐकून घे.

रत्न० महाराज, शोक करूं नको तर काय करूं! मला हा माझा जीव जड होऊन गेला आहे. मी माझ्या मंदिरांत पति आगमनाची मार्गप्रतिक्षा करीत होतें, इतक्यांत मला थोडीशी डुलकी आली आणि जर मी उठतें तर इकडे या अनोळखी जागेंत येऊन पडलें. (रडूं लागते.)

सुहा० मुली, हा सगळा गंधर्वी मायेचा खेळ आहे व त्यांत त्यांचा दुष्ट हेतु नसतो. तुझें चांगलें करण्यासाठींच त्याणें तुला इकडे आणून सोडली असावी असें वाटतें. कारण मी गंधर्वी मायेच्या घडलेल्या गोष्टी आजपर्यंत ऐकिल्या त्यांत असाच प्रकार घडल्याचें असतें. (आपणांत) काय असेल तें असो. पण मला जें आकाशवाणीनें सांगितलें त्याची वयाची थोडीशी जुळवाजुळव होते. आतां या मुलीला वाड्यांत घेऊन जाऊन हिचें परिपाळण करावें व हिचीं आप्तमनुष्यें हिला शोधण्यासाठीं आलीं म्हणजे त्यांचे स्वाधीन करावी. (रत्नकोंतेस) मुली, तूं मनांत कांहीं काळजी न बाळगतां निर्भयपणानें माझ्या बरोबर ये.

(रत्नकोंता व सुहास्यराज जातात.)

प्रवेश २.

(चंद्रमुख कानफाटया गोसाव्याच्या वेशानें प्रवेश करितो.)

चंद्र० (दुःखानें कपाळावर हात मारून) परमेश्वरा, माझ्या नशिबांत लवभरसुद्धां सुख लिहिण्यास झालें नाहीं काय! अरे, माझ्या प्रियेचा मी अंगिकार केल्यापासून हा वेळपर्यंत तिचे देहाचें मला दृढालिंगनसुख मुळींच घडलें नाहीं. पूर्वी वसंतारण्यांत तिचा व माझा योग घडल्यापासून तिचा मी अंगिकार केल्याची गोष्ट लोकोपवादासाठीं उघडकीस आणिली नाहीं. पुढें सर्वांसमक्ष मी तिचा अंगिकार करून तिच्या प्रेमालिंगनाला पात्र होतों न होतों तोंच ती पलंगा-

बकून नाहींशी झाली. अरेरे देवा, काय तिची दशा झाली असे-ल! तें तुलाच ठाऊक, माझी तर मति चालत नाहीं. (थांबून.) माझी प्रिया माझे मंदिरांतून नाहींशी झाली त्यास आज एक व-र्ष झालें त्या वेळपासून हा वेळपर्यंत मी नित्य एक वर्ष स-र्व पृथ्वीभर शोध केला पण तिचा अजून पत्ता मला लागत ना-हीं!

पद.

(माझा लक्ष्मण बांचेल काय. याचाली.)

थकलों शोधुनि मी तिजला ॥ नाढळे मजला ती ॥ धृ०॥
पलंगीं बसवुनियां जवळी ॥ तनु ही माझी जीकवळी ॥
चुंबन देत वेळोवेळीं ॥ ती प्रिया न दिसे हा ॥ थक०॥१
आवळुनि दोर्दंडें तिजला ॥ बापूं सहजींआ सजला ॥
शेवटीं घात मधें केला ॥ दुर्दैवें माझ्या हा ॥ थक०॥२॥

आज एक वर्षांत या पृथ्वींतील लहान मोठे सर्व भाग मी शोधि-ले परंतु माझ्या प्रियेचा मला कोंठच मागमूस लागला नाहीं. आतां बाकी हें विश्वपूर नगर धुंडण्याचें राहिलें आहे, यांतही जर तिचा पत्ता लागला नाहीं तर चातुर्थाश्रम घेऊन काशी क्षे-त्रांत रहावें म्हणजे सहजच चांद्रायण ग्रास सेवून काळ क्रमण केला असतां आत्महत्त्येवांचून देहाचा लवकर शेवट होईल. अ-रे! प्रियेचें स्मरण करितां करितां सहजच मी ह्या विश्वपुरी नगरांत येऊन पोचलों. आतां भिक्षेच्या निमित्तानें नगरांत-फिरावें म्हणजे शोध लागला तर पाहूं.

(चंद्रमुख राजवाड्यासमोरील चौकांत येतो. रत्नकांता व-तिची सखी कळावंती हीं वाड्याचे समोरील गच्चीवर येतात. व रत्नकांता जमिनीस हात टेंकून बसते.)

कळा० बाईसाहेब तुमची ही अशी अशक्त प्रकृति झाली असून तुम्ही असा हा सर्व वेळ शोक करितां हें तुम्ही काय योजिलें आहे? त्या सूर्यकांत बाळाकडे तरी पहा; त्यास पाहून म-नांत आनंद मानून कांहीं धीर धरा. तुम्ही अन्नपाणी सग-ळें टाकिलें आहे, अन्नानें जगायाला तरी कसें होईल?

रत्न०— आतां धीर धरून तरी काय करायाचें आहे! त्यांच्याविणें हा जीवच नकोसा झाला आहे. माझ्या गळ्यांत बाळक सूर्यकांताचें जर बेसण नसतें तर मी केव्हांच देहाचा शेवट करून घेतला असता.

कळा०— छेः छेः! बाई असें मनांतसुद्धां आणूं नकोत. ज्यापेक्षां तुम्ही त्या सद्गुरू पादुकांची भक्तिभावानें आराधना करित आहां त्यापेक्षां तोच परमेश्वर तुमची व तुमच्या पतीची लवकर गांठ घालून सुखी करील.

(चंद्रमुख अलुख पुकारीत फिरतो.)

कळा०— (चंद्रमुखास पाहून) बाईसाहेब, (बोट दाखवून) तो पहा कोणी जोगी अलुख पुकारीत फिरत आहे. त्याच्याकडे पाहिलें म्हणजे दुसरा चंद्रच आहे कीं काय असें दिसतें.

रत्न०— (उठते व पाहिल्यें करून) कोण बरें हा जोगी असावा! त्याजकडे पाहिलें म्हणजे चमत्कारिक मोह होतो. या जोग्यास हा वेष घेण्यास कांहीं तरी विरह व्यथेचें कारण असावें असें याचा हा साचिंत चेहरा पाहिला म्हणजे वाटतें. (कळावंतीस) तूं जा आणि तो मुक्कामास कोठें उतरला आहे याची चौकशी करून ये म्हणजे त्या ठिकाणीं आपण त्यांचे दर्शनास जाऊं.

कळा०— (पडद्यांत जाऊन येते.) बाईसाहेब, मी त्याची चौकशी केली. तो हिरा बागेंतील शिव मंदिरांत उतरला आहे व तो आतां तिकडेसच गेला.

रत्न०— कळावंते, चल बघूं आपणही हिराबागेंतील शिवमंदिरांत त्या साधूच्या दर्शनास जाऊं.

कळा०— चला तर बाई साहेब.

(रत्नकांता व कळावंती हिराबागेंतील शिवमंदिरांत दर्शनास जातात.)

प्रवेश ३.

हिराबागेंतील शिवमंदीर.

चंद्र०—(धुमी पेटवून बसतो.) काय माझ्या कर्माचे खेळ चालले आहेत पहा!

साकी.

राजपुत्र मी फकीर बनलों गेलों भुवन फिराया ॥
भिक्षा मागत असतां मेदिनिं विचित्र हरिची माया ॥
होणें नचुकेची ॥ इच्छा सर्वहि ही विधिची ॥

असो. ज्याअर्थी आपण हा जोगी वेष घेतलेला आहे त्या अर्थी त्याप्रमाणें आपणास आचरण केलें पाहिजे. (गोमुखींत हात घालून ध्यानस्त बसतो.)

(रत्नकांता व कळावती प्रवेश करितात.)

रत्न०—सद्गुरु स्वरुपी जोगी महाराज, ही अनाथ दुःखी अबला आपल्यांस नमस्कार करिते आहे याचा स्विकार करावा.

चंद्र०—काय भास पहा! शहरांत स्त्रियांमुळें आमच्या नित्य कर्माला व्यत्यय येतो व मन चंचल होऊन परमेश्वराच्या भक्तीला अंतर पडतें म्हणून नगरांत रहाण्याचें सोडून या हिराबागेंतील शिव मंदिरांत येऊन राहिलों. पण उपयोग काय! इकडेही त्याच्या दुप्पट भास. (रत्नकांतेकडे पाहून आपणांत) हिच्या मुखाकडे पाहिलें म्हणजे ही माझीच प्रिया आहे. काय असा भास होतो! (रत्नकांतेस.)

दिंडी.

कोण तूं गे कोठील कवणियाची ॥
मनीं इच्छा तुज काय असे साची ॥
सांग मजला तूं सोडोनि सर्व चिंता ॥
नको ठेवूं तूं मनीं दुःख आतां ॥ १ ॥

रत्न०—योगी महाराज, माझें दुःख सांगूं लागल्यास सर्व आयुष्य पुरणार नाहीं परंतु आपण विचारतां म्हणून सांगतें. ऐका.

कामदा.

तनया मी असें ऋषि उदरिंची ॥
कामिनी असें चंद्र मुखजिची ॥

श्वशुरग्राम तो विश्वपुर पुरी ॥
वस्ति आमुची सदैव त्यां घरीं ॥

(हें ऐकून चंद्रमुख आनंदीत होऊन आपणांत) आतां माझी-खात्री झाली; हा जोग घेतल्याचें सार्थक्य झालें. मी चंद्रमुख अशी हिला आतांच ओळख देऊन दुःखांतून सोडवावें परंतु असेंही करणें बरोबर नाहीं. कारण जर मी हिला एकदम ओळख दिली तर हिची खात्री न होऊन एखादे वेळीं जिवावरचें संकट येण्याचा संभव आहे म्हणून युक्तियुक्तीनेंच हें काम केलें पाहिजे. (रत्नकांतेस) बरें मग तूं इकडे कशी आलीस?

रत्न॰— महाराज, कर्मगतीनें इकडे आणिलें दुसरें कोण आणणार?

साकी.

मंदिरिं मंचकिं निद्रित असतां आलें मी हो इकडे ॥
कशि गति झाली नकळे मजला बघतां जिकडे तिकडे ॥
भ्यालें बहुत मनीं । आहें तूर्त राजसदनीं ॥

चंद्र॰— हे स्त्रिये, परमेश्वरानें ज्याज्याप्रमाणें लिखितरचना करून ठेविली आहे त्या त्याप्रमाणें प्राणीमात्रांना सुखदुःख भोगलें पाहिजे. तूं माझ्याकडे जी इच्छा धरून आलीस ती तुझी पूर्ण होऊन तुझा पति तुला लवकर भेटेल. जा तूं आतां कांहीं काळजी करूं नको.

रत्न॰— ईश्वर करो आणि आपला आशिर्वाद सफळ होवो. महाराज, आम्ही आतां वाड्यांत जाण्याविषयीं आज्ञा मागतों. (रत्नकांता चंद्रमुखास नमस्कार करिते.)

चंद्र॰— दीर्घायुष्यी होऊन तुझें इच्छित परमेश्वर पूर्ण करो.

रत्न॰— (जात असतां वाटेंत आपल्या मनांत) काय असेल तें असो. पण ह्या सत्पुरुषाच्या आशिर्वादापासून माझ्या प्रियाची व माझी भेट होईल अशा प्रकारचा मला भास होत आहे. (रत्नकांता व कळावती निघून जातात.)

चंद्र॰— (दुःखित होऊन आपणांत) अहाहा! काय तरी माझ्या-विरहानें माझ्या प्रियेची कशी दुर्दशा करून सोडली आहे ती.

पद.

(वस्थानें देह सारा. या चाली.)

मुखिं तेजी मुळिंच नाहीं पांदुरता दीसते ।।
वस्त्रहि तें जीर्ण आंगीं अति ऊदास वाटते ।।
वेणीची शुद्धि नाहीं गुंतुनियां गेलि ते ।।
मजसाठीं विषयप्रीया सर्व हि जी सोडिते ।। मुखिं० ।।

सर्व खरें पण आतां तिला ओळख कशी दाखवावी ? (आठवलेंसें करून) असें करावें. ती फार करून दर्शनास नेहमीं येत जाईल. एके दिवशीं बोलतां बोलतां तिला तुझा पति उद्यां भेटेल म्हणून सांगावें व त्या दिवशीं आपण हा जोगी वेष पालटून पूर्व वेष घेऊन आंत असावें म्हणजे ती माझे दर्शनास आंत आली कीं मला पाहून तात्काळ ओळखील. हीच तोड उत्तम आहे. आतां आपण रोजच्या रिवाजाप्रमाणें शहरांत भिक्षेस जावें. (चंद्रमुख भिक्षेस जातो.)

(बाळमित्र सावकारपुत्र प्रवेश करितो.)

बाळ. — सरकारांनीं राजवाड्यांत जी स्त्री आज वर्षभर आणून ठेविली आहे त्या स्त्रियेवर माझें मन भ्रमराप्रमाणें लुब्ध होऊन गेलें असल्यामुळें खातां जेवतां, उठतां बसतां मला त्या स्त्रियेचा ध्यास लागला आहे. आज एक वर्षांत अन्नाचा लेशसुद्धां कसला तो ठाऊक नाहीं. तर या स्त्रियेची प्राप्ति करून घेण्यास काय उपाय करावा? (आठवलेंसें करून) ती आतां हा दर रोज हिराबागेंतील शिवमंदिरांत जो जोगडा येऊन राहिला आहे त्याचे दर्शनास जाते. ती जाऊं लागली म्हणजे वाटेंत तिला फसवून आडमार्गानें नेऊन नंदन वनांत जावें मग ती एकटी माझे मताला नानू करणार नाहीं. तेथें तिचा यथेच्छ उपभोग घ्यावा. एक वेळ तिचा माझा प्रसंग घडल्यावर मग ती ह्या मर्दाला सोडणार नाहीं. असो. आतां शुभस्य शिघ्रं ह्या म्हणीप्रमाणें ती वस्तु लवकर पदरांत घेतली पाहिजे, व तिचा हिरा बागेकडे जाण्याचा वेळही हाच आहे ; म्हणून त्वरा करून प्रयत्नास लागावें.

(रत्नकांता व तिची सखी कळावंती प्रवेश करितात.)

कळा० — बाईसाहेब, आपण वाड्यांतून निघालों त्या वेळीं कडक ऊन पडलें होतें पण आतां पहा पर्जन्यानें किती अनर्थ मांडला आहे तो!

रत्न० — खरेंच सखे, आतां काय करावें! या पावसानें तर अनर्थ अतिशय उसळून दिला.

श्लोक.

येती मेघ किती कडाड करिती वीजा अतोनात ह्या॥
धारा दुर्धर सरासर अती सोटथापरी पडति ह्या॥
वायूचा सडका बहूत फडका वस्त्रें हि हीं भीजती॥
सारे वृक्ष पहा मुळासकटही पृथ्वीवरी लोळती॥

कळा० — खरेंच बाईसाहेब, इकडे पहा ह्या गंगानदीस कसा सपाट्यानें पूर येत चालला आहे तो.

श्लोक.

मला वाटतें प्रळय हा सत्य पूरा॥
किती मस्तकीं थडकती गारगारा॥
तिरा कडिलही भूमि ती उन्मळोनी॥
पहा पात्र तें रुंदलें आजि नयनीं॥

रत्न० — (घाबरून) अरे देवा! आमचा सुद्धां ग्रास ही जगज्जननी गंगा करते कीं काय कोण जाणे! सखे, या वेळीं आपला जीव वांचवून घेण्यास काय तजवीज करावी!

बाळ० — (आपणांत) ही संधि आपलें काय साधून घेण्यास फार चांगली आहे. (रत्नकांतेस व कळावंतीस) हे कुलीन स्त्रियांनों, तुम्ही आतां एक घटकाभर जर येथें राहिला तर ह्या नदींत बुडून फुकट प्राणास अंतराल. यासाठीं मजवर विश्वास ठेवून जर माझेबरोबर याल तर तुमचे प्राण वांचतील.

कळा० — बाईसाहेब, ह्या आपल्या संकटीं हा सावकार पुत्र बाळमित्र आला हें एक आपणांस परमेश्वर पोंचला असें समजलें पाहिजे.

बाळ० — स्त्रियांनों, तुम्ही जर विचाराखालींच वेळ घालवाल तर तुम्ही यमसदनास जाल नीं जालच पण तुमच्याबरोबर मला-

ही मृत्युगृहांत प्रवेश करावा लागेल. पहा आपला प्राण होई-ल त्या उपायांनीं संरक्षण करावा. याविषयीं सत्पुरुषाचें वा-क्य आहे.

अंजनीगीत.

शरीररक्षण करण्यासाठीं ॥ जाइल तरि जावो धनगाठीं ॥
मिळतिल साऱ्या इच्छित गोष्टी ॥ असतां जिव आपुला ॥

यासाठीं जर तुम्हांस प्राणाची आशा असेल तर मजबरोबर च-ला. मला तुमची दया येते म्हणून सांगतों.

कळा०— बाईसाहेब, आपण नशिबावर हवाला ठेवून बाळमित्राबरो-बर तो नेईल तिकडे जावें. यावांचून आपला प्राण संरक्षण कर-ण्यास दुसरी सोय नाहीं.

रत्न०— चला तर काय होईल तें होवो. मला कांहीं हा प्रसंग बरोब-र वाटत नाहीं. या सर्व अपशकुनांवरून आमचेवर जिवावर-चा प्रसंग गुदरणार. असो. आलेला वेळ कसा तरी काढला पा-हिजे. (रत्नकांता, कळावती व बाळमित्र नंदन वनांत येतात.)

बाळ०— (रत्नकांतेस) पहा सर्व वादळ नाहींसें होऊन हा चंद्रोदय झाला.

दिंडी.

पहा गगनीं हा चंद्र उदय झाला ॥
शुक्र गुरुचा तो समिप असे मेळा ॥
उजळ झाल्या ह्या दिशा आणि तारा ॥
नाश झाला गे समुळ अंधकारा ॥

रत्न०— फारच चांगलें झालें या एका संकटांतून सुटलों. पण राज-वाडा इकडून किती राहिला तें समजत नाहीं.

बाळ०— सखे, तुला राजवाड्याशीं काय करावयाचें आहे! जिकडे मी आहें तिकडे राजवाड्यापेक्षां जास्त सुख आहे असें समज.

रत्न०— अरे देवा! हा असें काय बरें भाषण करितो! या याचे बोल-ण्यावरून हा आमचेवरती तिसरेंच संकट आणूं पहातों अ-सें वाटतें.

कळा०— बाळमित्रा, तोंड आवरून बोल. कांहीं अंमलबिंमल केलें

आहेस कीं काय!

बाळ०— (रत्नकांतेस) खरोखरच मी अमली झालों आहे.

पद.

(बलसागर तुम्ही वीर०या चाली.)

मदनानेंच मज व्यसनी केलें अंमल चढवीला ॥
छळितो मज या सुंदरिसाठीं निष्ठुर फार मला ॥ धृ०॥
एक संवत्सर इजसाठीं मी अन्नत्याग केला ॥
शेवटिं दैवें घडवुनि आला योग सर्व हा भला ॥ २॥
शरीर माझें तप्त असे हें दे रतिसुख मजला ॥
स्फुरति पहा किती हस्त उभय हे दृढालिंगनाला ॥ ३॥

(रत्नकांतेस धरूं लागतो. रत्नकांता बाळमित्रास ढकलून भुमीवर पाडते.)

रत्न०— चोरा, आम्हांस फसवून अशी दुर्दशा करण्याचे आशेनें इकडे आणलेंस काय! अधमा, यापेक्षा आम्ही त्या गंगानदींत बुडून मेलों असतों तरी पुरवतें. चांडाळा, तूं असें समजूं नको कीं आम्ही अबला असल्यामुळें प्राण रक्षणासाठीं तुझ्या मतास अनुसरून मातापित्याचे तोंडास काळोखी आणून माझ्या पातिवृत्याचा भंग करून घेऊं म्हणून.

बाळ०— सखे, तुझें पातिवृत्य घटकाभर एकीकडे ठेव आणि मला भोग देऊन आपला प्राण वांचवून घे.

रत्न०— दुष्टा, मी आपल्या प्राणाची आशा मुळींच केलेली नाहीं. मला माझ्या पातिवृत्यापुढें माझा जीव कसपटाप्रमाणें वाटतो.

बाळ०— (आपणांत) ही कांहीं अशी एकाएकी वश होणार नाहीं. हिला चार दिवस चांगली कुचंबून पुष्कळ त्रास भोगावा लागला म्हणजे ही आपोआप आपल्यास अनुकूळ होईल. आतां काय आपल्या आटोक्यांत गोष्ट येऊन ठेपली आहे. (थोडा वेळ विचार करून) आतां असें करितों. यांना या समोरील विवरांत कोंडून ठेवून आंत वारा जाईल अशा तजविजेनें बंदोबस्त करून ही शिळा ठेवितों. म्हणजे सहजच यांना या कोंडमा-

राचें दुःख सहन न झालें म्हणजे उद्यां पायां पडत माझे गळीं-पडतील (बाळमित्र रत्नकांतेस व कळावतीस विवरांत कोंडून विवराचें दार बंद करितो आणि आपण निघून जातो.)

प्रवेश ४.

(शौर्यसागर, सुशिला बाई व रतिप्रिया प्रवेश करितात.)

शौर्य०__ (सुशिलाबाईस) प्राणसखे, पहा कर्मानें कशी पाठ पुरविली आहे ती! आपल्यास पोटचें संतान नसल्यामुळें चंद्रमुखाचा प्रतिपाळ केला पण तोसुद्धां आमच्या नशिबांत नाहीं. असो! प्रारब्ध करील तें कोणाच्यानेंही करवणार नाहीं! प्रिये, आपलीं बहुतेकसर्व क्षेत्रें पाहून झालीं फक्त रामेश्वर क्षेत्र पहाण्याचें उरलें आहे तिकडे जाऊं. (चालूं लागतात.)

(वनरक्षक प्रवेश करितो.)

शौर्य०__ अरे, तूं कोण आहेस बाबा!

वनरक्ष०__ महाराज, मी या वनाचा रक्षक आहें.

शौर्य०__ हे वनरक्षका, हा मार्ग कोठें गेला आणि संध्याकाळच्या मुक्कामाला गांव कुठला जवळ आहे?

वनरक्ष०__ महाराज, हा रस्ता नंदन वनांतून समोर रत्नपूर नगरास गेला आहे व रत्नपूर बरोबर इकडून तीन कोस आहे. कसेंही चालतां तरी संध्याकाळीं तुम्ही रत्नपुरास जाल.

शौर्य०__ अरे, या रत्नपूर नगरच्या राजाचें नांव काय!

वनरक्ष०__ त्यांचें नांव सुहास्यराज. आम्ही त्यांचेच नोकर, त्यांणीं हें अरण्य राखण्याचें कामगिरीवर मला नेमलें आहे. काय सांगावें महाराज, आमच्या धन्यासारखा राजा नरवंड पृथ्वी शोधिली तरी मिळणार नाहीं.

रति०__ (शौर्यसागरास) बाबा हो, हीच माझ्या प्राणनाथाची नगरी. ज्यांच्या अंगसुखाला मी आज सोळा वर्षे अंतरलें त्यांचेंच हें नांव या वनरक्षकानें सांगितलें तें.

शौर्य०__ (रतिप्रियेस) मुली, असें आहे तर हा योग काशीविश्वेश्वरानेंच घडवून आणिला असें समजलें पाहिजे. कारण

तुझा पति तुला आतां लवकरच भेटेल.

(वनरक्षक जातो.)

रति०- बाबा, आज आपण तिकडे वाड्यांतच जाण्याचें कराल तर बरें होईल.

सुशि०— प्राणनाथ, मलाही असेंच वाटतें. आज रत्नपुरास जाऊन हिला हिचे नवऱ्याचे स्वाधीन करावी म्हणजे ही तरी ह्या दुर्धर त्रासांतून सुटेल.

शौर्य०— होय तर काय असेंच करूं.

(सर्वत्र चालूं लागतात. विश्रांति घेण्यासाठीं ज्या ठिकाणीं रत्नकांतेस व कळावतीस बाळमित्रानें कोंडून ठेविलें होतें त्या विवराजवळ बसतात.)

सुशि०— (शौर्यसागरास हातानें दाखवून) प्राणनाथ, इकडे या बाजूस बघा कोणाचा बारीक बारीक दुःखध्वनि ऐकूं येतो तो.

शौर्य०— (ऐकलेंसें करून) खरें, हा ध्वनि जवळच या भूगींतून निघत आहे. (पुनः कान देऊन) प्रिये, ही जी जवळ शिळा आहे तिच्या आंतून हा शब्द ऐकूं येतो. आपण ही शिळा उघडून काय असेल तें पहावें.

सुशि०— प्राणनाथ, छे: छे:! आपण परदेशांत असल्यामुळें असलें दुर्धर कर्म करूं नये, भलतेंच अरिष्ट आंगावर येईल.

शौर्य०— वेडी आहेस यांत कसलें अरिष्ट आंगावर येणार.

सुशि०— बरें आपली मर्जी.

(शौर्यसागर शिळा उघडवितो व आंतून रत्नकांता व कळावती बाहेर निघतात. रत्नकांतेस पाहून सर्वत्र सानंदीत दुःखांत निमग्न होतात. रतिप्रिया रत्नकांतेस पोटाशीं धरून चंद्रमुखास आठवून रडूं लागते. शौर्यसागर तिचें शांतवन करितो व सर्व मिळून रत्नपुरास जाऊं लागतात.)

पडदा पडतो.

अंक सहावा समाप्त.

अंक ७.

प्रवेश १.

रत्नपूर नगरच्या राजवाड्यासमोरील चौक.

सुहास्यराज व त्याचा सेवक प्रवेश करितो.

सुहा०— (सेवकास) अरे, रत्नकांतेचा शोध लावण्यासाठीं प्रधानजीस पाठविला होता तो अजून कां बरें आला नाहीं! मला वाटतें अद्यापि तिचा पत्ता लागला नाहीं. अरेरे! काय तिचे गुण.

पद.

(मंदभाग्य मी ऐसा० या चालीं.)

छंद नसे तीस दुसरा ॥ आठवी पत्रतारा ॥ धृ० ॥
सासू श्वशूरसदोदित ॥ आळवित आधीं ॥
ठाउक तिजला नाहीं ॥ परगृह कधीं ॥
वाक्य जिचें अतिदुर्लभ ॥ निश्चल जलधी ॥चाल॥
कांतसमागम इच्छा ॥ तिजलागीं तधीं ॥ छंद० ॥१
सूर्यकांत मुलाहुनि प्रीय ॥ पातिव्रत्य तिला ॥
मुख शांत करोनी असे जी ॥ न दुखवी कोणाला ॥
छपवुनि ठेवि आपूल्या ॥ सकल चिंतेला ॥ चाल ॥
व्हावें मज सूख म्हणुनी ॥ भाव दावि मला ॥ छंद० ॥

(प्रधान व बाळमित्र प्रवेश करितात.)

प्रधा०— (सुहास्यराजास) सरकार, आपल्या आज्ञेप्रमाणें रत्नकांता बाईसाहेबांचा सर्व शहरांत घरोघर शोध केला परंतु कोठेंही थांग लागत नाहीं. मात्र (बाळमित्राकडे बोट करून) या बाळमित्राकडून तिच्याबद्दल विपरीत खबर लागली आहे ती कळविण्यास मला मोठें दुःख वाटतें. (हें ऐकून सुहास्यराज दुःखीत होतो.)

सुहा०— (बाळमित्रास) सांग रे बाबा तुला रत्नकांते विषयीं काय खबर समजली आहे ती!

बाळ०— सरकार, आपल्यास ठाऊकच असेल कीं रत्नकांता बाई-

साहेब हिराबागेंतील शिवमंदिरांत जो जोगी येऊन राहिला आहे त्याचे दर्शनास जात होत्या तें.

सुहा॰— होय. त्या जोगयाचे दर्शनास नेहमीं जाण्याविषयीं तिणें माझी आज्ञा घेऊन ठेविली होती त्याप्रमाणें ती जात असे.

बाळ॰— नित्याप्रमाणें आज त्या ज्या वेळीं हिराबागेंतील शिवमंदिराकडे गेल्या त्या वेळीं तो जोगी देवालयांत नव्हता, गंगेकडे स्नानास गेला होता म्हणून तीं उभयतांही त्याचे दर्शनासाठीं गंगेकडे गेलीं होतीं. त्या वेळीं एकांतवास पाहून त्या जोगयानें पापदृष्टीनें त्यांच्यावर जुलूम केला; पण त्यांनी त्याची निर्भर्त्सना केल्यामुळें रागानें त्या चांडाळानें त्या उभयतांस गंगेंत लोटून दिलें. इतक्यांत मी तिकडे गेलों परंतु तीं बुडून तळास गेलीं असल्यामुळें त्यांना वांचविण्याचा माझा नाइलाज झाला. मग हें वर्तमान आपल्या कानावर घालण्याकरतां इकडे येत असतां वाटेंतच प्रधानजींची गांठ पडली. हें घडलेलें खरें वर्तमान आपल्या कानावर घातलें आहे याचा बंदोबस्त महाराजांनीं करावा.

सुहा॰— (दुःखानें) काय दुष्ट कृतघ्न तो जोगी!

पद.

(वैबाल्यें युक्त जैसें, या चालीं.)

नव्हे जोगी काळ झाला त्या रत्नकांतेचा ॥
दुष्टानें घात केला व्यर्थचि त्या अबलेचा ॥
पुरले काय हेतु त्याचे घेउनियां प्राण तिचा ॥
आठवुनियां आप्तमित्रां घुटमळेल जीव तिचा ॥ १ ॥

(रागानें) प्रधानजी, आतांचे आतां तुम्ही स्वतः जाऊन त्या दुष्टाच्या पिछाडया बांधून इकडे घेऊन या.

(इतक्यांत फिरत फिरत चंद्रमुख राजवाड्यासमोरील चौकांत येतो.)

चंद्र॰— (आपणांत) बारीक रीतीनें विचार केला म्हणजे या जगांत परमेश्वरावांचून कांहीं नाहीं पण ही हरिमाया जीवन्मात्रामागें लागली आहे म्हणून आपल्यास हें माझें तुझें असें वाटतें.

या गोष्टीचा आम्हास समज आहे तरी माया तुटण्याचें काम फार कठीण पडतें. मीच पहा. माझे प्रियेसाठीं सर्व राज्यकारभार सोडून तिच्या विरहानें कसा फकीर बनलों आहें तो. नाहीं तर ती कुठली व मी कुठला!

साकी.

कोण कुणाचा विचार करितां सर्वहि मावपसारा॥
निःसारी हा प्रपंच सारा परि आवड संसारा॥
भ्रांतिच वाटतसे। भासे शाश्वत सर्व असे॥

सर्व खरें परंतु नित्यक्रमाप्रमाणें आज माझी प्रिया माझ्या दर्शनासाठीं कां बरें आली नाहीं! ती न आल्यामुळें आज मला अगदीं चैन पडेनासें झालें आहे. (वाड्याकडे पाहून) मी - फिरत फिरत या राजवाड्यासमोर आलों, आतां आंत जावें म्हणजे सहजच ती माझ्या दर्शनास बाहेर येईल. (मोठ्यानें अलख, अलख पुकारीत जिकडे सुहास्यराज शोक करीत होता तिकडे येतो.)

सुहा०— (चंद्रमुखाला पाहून) प्रधानजी, पहातां काय या अलख पुकारणाऱ्या खुनी गोसावड्याच्या मुसक्या बांधा. आणि या दुष्टाच्या पायांत माझ्यादेखत बिड्या ठोका. (प्रधानजी चंद्रमुखास पकडून त्याचे पायांत बिड्या ठोकतो.)

चंद्र०— अरे, तुम्हीं काय हा अनाचार मांडिला आहे! विनाकारण पापाला मात्र साधन करून घेतां. तुम्ही निरपराधी मला धरितां काय? माझे पायांत बिड्या ठोकतां काय! हें आहे तरी काय!

सुहा०— चांडाळा, तोंड घेऊन बोलतोस आणखी. जोगड्या, पापबुद्धीनें अबलेचा खून केलास ना! अरे राक्षसा, त्यांचा खून करते वेळीं निर्लज्जा मनांत कांहीं तरी दया ठेवावी होतीस.

चंद्र०— अरे, पण तुम्ही खून खून म्हणतां हें काय! मला तर यांत कांहींच समजत नाहीं.

सुहा०— कृतघ्ना, डोळे झांकून रात्र करूं पहातोस काय! घातक्या, मूळची रात्र ती रात्रच असते. अधमा, रत्नकांता तुझ्या दर्श-

नास येत होती ना!

चंद्र०— (दचकून विस्मित होतों. आपणांत) हे जो काय खून खून म्हणतात तो माझ्या प्रियेचाच नसेल ना! देवा, हें खरें करून असले शब्द ऐकण्याचा मजवरती प्रसंग आणूं नको. (घाया-ळ पडतो.)

बाळ०— पाहिलेंत काय सरकार, रत्नकांतेचें नांव काढण्याबरोबर भयभीत होऊन त्याच्या तोंडावरचें पाणी पळून गेलें तें. आ-णि आपल्या हातून कर्म न झाल्याची खात्री करून दाखविण्या-साठीं हा हीं सोंगें करितो.

सुहा०— माझी पुरी खात्री झाली, हें काम या दुष्टाचेंच आहे. - (चंद्रमुखास) पापीष्टा, तूं रत्नकांतेचा ती तुझ्याबरोबर-पापकर्माला प्रवृत्त होईना म्हणून तिला व तिची सखी कळा-वंती या उभयतांना गंगेंत लोटून त्यांचा खून केला नाहींस-काय! (हें ऐकून चंद्रमुख मूर्च्छित पडतो.) (प्रधा-नजीस) रत्नकांतेचें नांव काढण्याबरोबर हा वेळोवेळीं मू-र्च्छित पडतो याचें कारण काय!

प्रधा०— महाराज, हे जोगी लोक मोठे कपटी असतात. कर्म छपवि-ण्यासाठीं हे अनेक रीतीचीं सोंगें करून दाखवितील.

चंद्र०— (आपणांत) अरेरे! माझी प्रिया इतके कष्ट सोसून मला सोडून परलोकवासी झाली ना! आपणास तरी वांचून गग-नाला काय झेंडा लावावयाचा आहे? आतां ज्या रस्त्याने मा-झी प्रिया गेली आहे तोच मार्ग आपण लवकर धरावा म्हण-जे मीही या सर्व दुःखांतून सुटेन.

प्रधा०— (चंद्रमुखास टकलून) अरे स्त्रीघातक्या अधमा, बोल बो-ल तूं त्यांचा घात केलास कीं नाहीं तें!

चंद्र०— न्यायी मनुष्यांनों, तुम्ही माझ्यावर जो आरोप आणिला आ-हे तो मी नाहीं म्हटला म्हणून मी न केल्याबद्दल तुमची खा-त्री होईल काय? तर नाहीं. मी खरोखर ईश्वर साक्षी करून तुम्हांला सांगतों कीं, हें कृत्य मी केलें नाहीं व अशा प्रकारचें कृत्य माझ्या हातून कधीं घडणार नाहीं. पण जर तुम्ही हें-

कर्म मीच केलें असें म्हणतां तर तुमच्याच म्हणण्याप्रमाणें मला कबूल करणें भाग आहे.

सुहा०— आतां अगदीं संशय नाहीं. हासुद्धा आपल्या तोंडानें हें अघोर कृत्य केल्याचें कबूल करितो यासाठीं आजच याला या कर्माचें देहांत प्रायश्चित द्या व होतील तितके हालहाल करून याचे प्राण घ्या.

प्रधा०— आज्ञा सरकार

(चंद्रमुखाच्या दोनी दंडास काढण्या बांधून घेऊन जातात व सुहास्यराज आपल्या मंदिरांत जातो.)

प्रवेश २.

रत्नपूर नगरांतील पहिली वेश.

(चार चांडाळ चंद्रमुखाच्या दोन्ही दंडास काढण्या बांधून ओढीत, मारीत, झोडीत घेऊन येतात.)

पहिलाचां०— या जोगड्यास सुळी देण्यासाठीं स्मशानभूमींत नेतेवेळीं वाटेंत दवंडी पिटून या खुन्याला सुळीं देण्याचें कारण सर्वांला समजण्यासाठीं जागोजागीं कळवीत असावें अशी राजाज्ञा झाल्यामुळें या पहिल्या वेशींत प्रथमतः दवंडी पिटूंया. (मोठ्यानें) अहो नगरवासी जनांनो, ऐका ऐका. हा जोगडा कपटी वेश घेऊन या शहरांत हिराबागेंतील शिवमंदिरांत येऊन राहिला. याणें पापबुद्धि मनांत ठेवून ती शेवटास गेली नाहीं म्हणून रत्नकांता व तिची सखी कळावती या उभयतांचा गंगा नदींत लोटून खून केला म्हणून सरकारांनीं याला गाढवावर बसवून सात पाट काढून सर्व शहरांत फिरवून मसणवटींत सुळावर चढविण्याचा हुकूम केला आहे. त्याप्रमाणें आम्ही याला सुळावर देण्यासाठीं घेऊन जात आहों. याप्रमाणें जर कोणी उभय लोकविरुद्ध कर्म करील तर त्यास महाराज याहूनही कडक शिक्षा देतील. (आपणांत) मनुष्याचें कपट व गुप्तावगुण पूर्वीं समजून येत नाहींत. हा जोगीच पहा.

श्लोक.

धरोनी अर्थी जोग हा बैसला हो ॥
सुभावी जनां दावि वीरक्तता हो ॥
परी शेवटीं केलें ऐशा कृतीला ॥
कसें पूरलें दुष्ट या राक्षसाला ॥

आतां याला पुढील वेशींत घेऊन जाऊं.

चंद्र०— अरेरे! हे चांडाळसुद्धां मला राक्षसांची उपमा देतात ना! हर हर देवा!

श्लोक.

होती आजवरी मला कशि तरी आशा तिची रे हरी ॥
नाहीं शेवटिं ती तुला पुरवली खंडोनि गेली दुरी ॥
मातें वांचुनियां तुझ्या विण प्रिये सौख्यास मूळीं नसे ॥
येतों थांब जरा नको करूं त्वरा मार्गासि त्याची असें ॥

रत्नपूर नगरांतील दुसरी वेश.

दुसराचां०— हा जो शोक करितो यावरून हें कर्म याचे हातून घडलें असें मला वाटत नाहीं. याणें नाइलाजामुळें हें घोर कृत्य आपले आंगावर घेतलें आहे. असो. राजाचे आज्ञेप्रमाणें आपल्यास वर्तन केलें पाहिजे. (आपणांत.)

श्लोक.

होतें जें विधिनें कपाळिं लिहिलें त्या त्या प्रमाणें घडे
यत्ना त्यासि नसे उपाय नसुचे कूकर्म तें आवडे ॥
कर्मानें धरिलें गुरूस आणिलें सूळावरी द्यावया ॥
तैसाची मजला प्रसंग दिसतो जोग्यावरीहीच या ॥

आपल्यास बाईट वाटून उपयोग काय? सरकार हुकुमाप्रमाणें याला स्मशानांत नेऊन सुळावर दिल्यावांचून निर्वाह नाहीं. (मोठ्यानें) हे स्वहित इच्छिणाऱ्या नागरिक आबालवृद्धांनों, ऐका ऐका. या जोग्यानें कपटी वेश घेऊन राजकन्या रत्नकांता हिशीं दुराचरणाची आशा धरून त्यांचेवर बळजोरी करूं लागला परंतु त्यांणीं त्यांना धिःकार केल्यामुळें राग येऊन त्याणें रत्नकांता बाईसाहेबांचा व तिची सखी कळावती या उभयतांस गंगानदींत लोटून त्यांला प्राण घेतला म-

णून राजानें ह्याला सुळावर देण्याची शिक्षा दिली आहे. राजा-ज्ञेप्रमाणें आम्ही ह्याला स्मशानभूमींत सुळावर चढविण्यासाठीं घेऊन जात आहों. पहा पहा, जर कोणी असें उभय लोकविरुद्ध कर्म करील तर महाराज त्याला याहीपेक्षां जास्त शिक्षा करितील.

(याप्रमाणें चंद्रमुखास थिंड काढीत तिसऱ्या वेशींत घेऊन येतात.)

चंद्र०— (वक्षस्थळ बडवून) नारायणा! काय रे माझ्या देहाची दुर्दशा मांडली आहेस!

श्लोक.

पुष्पें ताम्र धरोनि एकवट तीं माळा करोनी तिनी ॥
वस्त्रारक्तपणासि आणुनि स्वयें देती मला सेवनीं ॥
माझें काढुनि सात पाट करिती विद्रूप नारायणा ॥
घे घे बोलुनि शद्ब मारिति कसे नाहीं दया यां मना ॥

(आपणांत) जगदीशा! मला माझें मरण पुत्रजन्माचे उत्साहाप्रमाणें आनंद देतें! परंतु सर्व लोकांचा समज माझ्या प्रियेचा नाश मी केला असा झाला आहे त्याचेंच मला दुःख वाटत आहे.

अंजनीगीत.

मजला वाटे दुःख प्रियेचें ॥ त्याहुनि देवा जनदोषाचें ॥
म्हणतिल खूनी जन हे साचे ॥ स्त्रीघातकि सहजीं ॥

(चंद्रमुख मूर्च्छित भूमीवर पडतो व तिसरा चांडाळ त्यास खेंचून उठवितो.)

चंद्र०—

साकी.

दुःखानें मी निर्जिव झालों पाय न उचले मजला ॥
म्हणुनी हे मज फरफर ओढिति रक्तानें देह भिजला ॥
कंटक रुतती हे। देवा काय हाल पहा हे ॥

रत्नपूर नगराची चौथी वेश.

चौथा चां०— जोगड्या, तुझी मरणाची जागा जवळ येत चालली.

यासाठीं तुला शेवटचें परमेश्वराचें नामस्मरण करून घ्यावयाचें असेल तर घे.

चंद्र०— (आपलें सर्वांग न्याहाळून पहातो.) हाय हाय! शंकरा, काय माझ्या सर्वांगाची दुर्दशा करून सोडली आहेस ही!

श्लोक.

माझ्या गळां घालुनि ताम्रमाळा ॥
देवूनि हातीं अति दीर्घ शूळा ॥
चाबूक मारावरि मारिताती ॥
निष्ठुर शब्दें मज टोंचिताती ॥

चांडा०— हे नागरिक जनांनों, ऐका ऐका. हा जोगी कपटी वेष घेऊन राजकन्या रत्नकांता हिच्याशीं दुराचरणाची आशा धरून—ती न पुरल्यामुळें रागानें यानें तिचा व तिच्या सखीचा गंगेंत लोटून खून केला, म्हणून राजानें याला सुळीं देण्याची शिक्षा दिली आहे. जर कोणी असें अघोर कर्म करील तर त्यास सरकार याहीपेक्षां अधिक शिक्षा देतील.

चंद्र०— प्रिये, मला एकट्याला इकडे ठेवून तुला परलोकीं जाण्यास कसें बरें पुरवलें? परमेश्वरा,

श्लोक.

होती आजवरी मला कशि तरी आशा तिची रे हरी ॥
नाहीं शेवटिं ती तुला पुरवली खंडोनि केली दुरी ॥
मातें वांचुनियां तुझ्याविण सखे सौख्यास मूळीं नसे ॥
येतों थांब जरा नको करूं त्वरा मार्गासि त्याची असें ॥

सखे,

पद.

(तुज दिलें दुःख मी म्हणुनी० याचाली.)

नोळखिलें तुज म्हणुनी ॥ तूं गेलिस मजवर रुसुनी ॥
करिशिल तूं ऐशी करणी ॥ हें ठाउक मज ना स्वप्नीं ॥
कसा राहूं तुजवांचोनी ॥ दिन झालों बघ तूं नयनीं ॥
नसतां पाणि मिनासी धरणी ॥ तरि मृत्युच ये तडफडुनी ॥

(चांडाळ चंद्रमुखास सुळीं देण्याचे जागीं स्मशानांत आणि—

तात.)

चांडा०— गोसावड्या, (बोट दारववून) पहा तुला सुळावर देण्यासाठीं ही जागा तयार केली आहे.

(चंद्रमुख भयंकर जागा पाहून रडूं लागतो.)

चंद्र०— काय मी करटया नशिबाचा! मला जन्मांत आईबापांचें सौख्य कसलें तें माहित नाहींच पण ज्या आईबापांनीं माझें प्रतिपालन केलें त्यांची सुध्दां मला शेवटची भेट घडली नाहीं! (चंद्रमुख शौर्यसागरास स्मरून)

पद.

(चाल सदर.)

पाळिलें तूं मजलागीं॥ मीइच्छित सर्वहि भोगीं॥ ध्रु०
ठाउक ना भेद तुज स्वांगीं॥ बाप न तुजसम त्रिजगीं॥
मम मायेस मानिसि मुलगी॥ तशि माझी राखिसि सलगी
शेवटिं जोगी जहालों योगी॥ जातसें यमसदनालागीं॥

चांडा०— कृतघ्ना, वेळ होत चालला चढ या पहिल्या पायरीवर. (चांडाळ चंद्रमुखास सुळीं देण्याचे पहिल्या पायरीवर नेतात.)

चंद्र०— नारायणा! माझी तुला कांहींच करुणा येत नाहीं ना! देवा! तूं भक्तांचे संकटीं नाना अवतार धारण करून दासांवरचीं पर्वतप्राय संकटें दूर करून त्यांनां सुखी करितोस अशी तुझी कीर्ति गिरीकपाटीं जाऊन लपली काय! देवा! काय माझेवरतीहा - विपरीत प्रसंग आणिला आहेस!

श्लोक.

माझ्या गळां घालुनि ताम्रमाळा॥
गुल्लाल अंगावरि लावियेला॥
हस्तामधें देउनियां शुळातें॥
ओढोनि नेती जणुं बोकडातें॥

विदु०— (काठी टेंकीत टेंकीत प्रवेश करितो.) काय तरी माझी स्थिति झाली आहे पहा! माझा मित्र चंद्रमुख गेल्यापासून आज एक वर्षांत मी अन्नसुध्दां सेवन केलें नाहीं, त्याच्यावांचून मला हा माझा प्राण नकोसा झाला आहे. अहाहा! काय हो-

तो मैत्रीला योग्य मनुष्य. त्याची आठवण झाली म्हणजे मला या भूमीवरसुद्धां रहावत नाहीं, अशी माझी अवस्था होते.- शौर्यसागराच्या आज्ञेप्रमाणें आज मी त्याला एक वर्षपर्यंत सगळ्या पृथ्वींत शोध केला परंतु कोठें थांग लागेना. काल तो रत्नपुरांत कानफाट्या गोसाव्याच्या वेषानें आहे अशी थोडीशी गुणगुण ऐकली होती, म्हणून मी रत्नपुरास येण्यासाठीं निघालों तो येथपर्यंत कसा तरी येऊन पोंचलों. (जनसमुदायाकडे पाहून) हे लोक जमून काय पहात आहेत ? आपण त्यांस जाऊन विचारावें. (लोकांस) अरे, तुम्ही सर्वत्र मिळून काय पहातां ?

लोक:— अरे म्हातारड्या, तुला असल्या कशाल्या पंचायती पाहिजेत? कोठें भिक्षाबिक्षा मागून घ्यावयाची असल्यास माग जा.

विदु०— अरे, पण सांगायाला तुमचें काय जातें ?

लोक:— अरे, या गांवांत कोणी एक जोगी रहात असे. त्याणें राजकन्येचा व तिचे सखीचा गंगा नदींत लोटून खून केला म्हणून महाराज सुहास्यराज यांणीं त्याला सुळावर देण्याची शिक्षा केली त्याप्रमाणें त्याला सुळावरती देत आहेत समजलास?

विदु०— देवा, तो जोगी माझा मित्र चंद्रमुख नसेल ना ! (गडबडीनें जिकडे चंद्रमुखास सुळीं देत होते तिकडे जातो.) (कपाळावर हात मारून) फुटलें माझें नशीब ! देवा, मला तरी कशाला वांचविलेंस ? असे हे माझे मित्राचे हाल पहाण्यासच काय !

चंद्र०— (विदुषकास ओळखून चांडाळास हात जोडून) तुम्ही मला एक क्षणभर माझ्या मित्राशीं बोलण्याला परवानगी द्याल तर तुमचें परमेश्वर कल्याण करील.

चांडा०— घे घे एकदां तुझ्या काय मनांत आहे तें आटपून.

चंद्र०— (विदुषकाचे गळ्यास मिठी मारून) मित्रा, मी तुला टाकून परलोकास प्रियेच्या भेटीला चाललों ! तू माझ्या बाबास व आईस हें वर्तमान कळवून त्यांचें समाधान कर.

विदु०— मित्रा, तूं चाललास आणि मी तरी कशाला राहूं ? अरे पण तुला हे लोक कशासाठीं सुळावर देतात तें तर सांग ?

चंद्र०

श्लोक.

मित्रा मारियली प्रिया म्हणवुनी दोषा मला देति हे ॥
नाहीं नाहिं मला सख्या कळत ही झाली गती कैशि हे ॥
गेली ती परलोकिं ठेवुनि अम्हां दुःखांत ऐशा परी ॥
जातों मी तिकडे रहा तूं इकडे ठेवीं दया तूं पुरी ॥

विदु० (रडत) नाहीं रे नाहीं तूं गेलास तर मी मुळींच प्राण ठेव-णार नाहीं.

चंद्र० नको रे बाबा, तूं तरी माझ्या गरीब आईबापाचें शांतवन कर-ण्याकरतां रहा.

विदु० (चांडाळांस) अरे, तुमच्या राजानें हा निवळ अन्याय केला असून फुकट माझे दीन मित्राचा प्राण घेत आहे. या माझे मित्राचे हातून असें कुकर्म कधींही घडणार नाहीं. कोणी दु-ष्टानें आपण कर्म करून याच्यावर ही विनाकारण आग पाख-डली आहे. चांडाळानों, तुम्हांला याचा जर प्राणच घ्यावया-चा आहे तर घ्या; पण आणखी ही याची अशी दुर्दशा कां मांडली आहे !

चंद्र० मित्रा, माझी दुर्दशा कशी मांडली आहे ती मीच सांग-तों ऐक.

श्लोक.

माझ्या गळां घालुनि ताम्रमाळा ॥
गुल्लाल आंगावरि लावियेला ॥
हस्तामधें देउनियां झुळातें ॥
ओढोनि नेती जणुं बोकडातें ॥

विदु० अरे चांडाळानों, मी तुमच्या पायां पडतों. अरे, याच्या ऐव-जीं मला सुळावरती देऊन याला सोडवा.

चां० (विदुषकास लोटतात) अरे, आम्ही राजसेवक, आम्हां स राजाच्या आज्ञेप्रमाणें वर्तन ठेविलें पाहिजे. (चंद्रमुखा-स) पुरे कर आतां तुझा शोक, याउपर आमच्याकडून तु-ला अवकाश मिळणार नाहीं.

(विदुषक चंद्रमुखास घट्ट मिठी मारतो. त्यास चांडाळ ओढून काढून सुळावर देण्याचे जागीं चंद्रमुखास उभे करितात.)

प्रवेश ३.

(शौर्यसागर, सुशिलाबाई, रतिप्रिया, रत्नकांता व कळावती प्रवेश करितात.)

शौर्य०_ हे लोक कशासाठीं जमले आहेत कळत नाहीं. यात्रा जमली आहे असें म्हणावें तर सर्वत्रांच्या डोळ्यांतून अश्रुधारा निघत आहेत. यावरून हा कांहीं तरी दुःखाचा प्रसंग आहे. (लोकांकडे चौकशी करीत आहे इतक्यांत विदुषक येतो.) अरे! हा इकडे कधीं आला आणि रडतो कां? अरे वक्रदंता, तूं इकडे कधीं आलास व तुला कोणी मारलें कीं काय?

विदु०_ राजा, मला माझ्या ह्या फुटक्या नशिबानेंच मारलें. (कपाळावर हात मारून येतो व रत्नकांतेस पहातांच) वयनी, या वेळीं इकडे तिकडे पहाणें एकीकडे ठेव आणि जलदी करून तो पहा तुझा नवरा तुझ्यामुळें सुळावरती जात आहे त्यास लवकर जाऊन सोडवून घे.

(रत्नकांता गडबडीनें जाऊन चंद्रमुखास घट्ट मिठी मारते.)

चांडा०_ अरे हा काय अद्भुत चमत्कार! ह्या रत्नकांता बाईसाहेब व ही कळावंती प्रत्यक्ष जीवंत आहेत!

(चंद्रमुखास सुळावरून खालीं उतरतात.)

रत्न०_ (चंद्रमुखास) प्राणनाथ, आपले वरती हा आरोप कोणी आणिला!

चंद्र०_ सखे, बाळमित्र या नांवचे मनुष्यानें राजास तुझा व तुझी सखी या उभयतांचा मी नदींत लोटून खून केला असें सांगून त्यानेंच हा मजवर दोषारोप स्थापन केला.

रत्न०_ प्राणनाथ, त्याच दुष्टानें पापबुद्धीस आम्ही अनुकूल झालों नाहीं म्हणून आमचा नाश करण्यासाठीं आम्हांस नंदनवनांतील विवरांत कोंडून ठेवून निघून गेला.

(इतक्यांत शौर्यसागर, सुशिलाबाई व रतिप्रिया चंद्र-मुखास घेऊन भेटतात.)

चंद्र०—(रतिप्रियेस) प्राणसखे, तुझा खून झाल्याचें माझ्या कानांत पडण्याबरोबर माझी काय दशा झाली असेल याचा तूंच विचार कर. प्रिये, तुझ्यासाठीं मी फकीर होऊन सर्व दिशा फिरलों पण तुझा पत्ता लागला नाहीं. शेवटीं तुझा शोध लागेल—म्हणून इकडे आलों तर इकडे अशा दशेला पावलों.

रति०—बाळा चंद्रमुखा, ज्या राजानें तुला सुळावरती देण्याचा हुकूम केला त्या राजाचा तूं पुत्र आहेस. पण तुझ्या कर्मांत बापाच्या हातून इतका त्रास भोगण्याचा होता म्हणून असें झालें.

सुशि०—(रतिप्रियेस) ताई, झालेल्या गोष्टीविषयीं पुनः पुनः आठवण करून दुःख करीत बसणें चांगलें नव्हे.

रत्न०—(चंद्रमुखास)

श्लोक.

नाथा व्यर्थ तुम्हास मी छळियलें माझ्यामुळें दुःख हें॥
साह्रूं भाग पडे प्रिया अतितता घेणें तुम्हा प्राप्त हें॥
ऐशी हो स्वरुपा बिभत्स करण्या पायांच मी जाहलें॥
द्याया त्रास अशी कशास करटी जन्मास या पावलें॥

विदु०—मित्रा चंद्रमुखा, वयनी, तुम्ही जितका जितका शोक-कराल तितकें अधिक दुःख होणार यासाठीं दुःख टांका आणि परमेश्वरानें आपल्यास ऐन संकटाचे वेळीं पावून दुःखांतून सोडविल्याबद्दल त्याची स्तुति करा.

शौर्य०—(विदुषकास) तूं राजवाड्यांत जा आणि सुहास्यराजास हें इकडे घडलेलें सर्व वर्तमान जाऊन सांग.

विदु०—बरें आहे. (निघून जातो.)

प्रवेश ४.

रत्नपूर नगरच्या राजवाड्यांतील गायनशाळा.

(सुहास्यराज व रत्नकांतेचा मुलगा सूर्यकांत, प्रधान व सेवक प्रवेश करितात.)

सुहा० — प्रधानजी, कमाल आहे प्रारब्धाची! या बाळक सूर्यकांताकडे पाहिलें म्हणजे रत्नकांतेची आठवण होऊन जन्मारभ्यसर्व दुःखें माझ्यापुढें साक्षात् येऊन उभीं रहातात.

प्रधा० — सरकार, हा सूर्यकांत आपलाच पुत्र असें समजून याचें प्रतिपाळण करून याजकडेसच पाहून कर्मणूक केली पाहिजे.

(विदुषक प्रवेश करितो.)

विदु० — (सेवकास) अरे राजदुता, राजास जाऊन सांग कीं, विश्वपूर नगराचा स्वामी शौर्यसागर राजा याजकडून शुभ वर्तमानाचा नजराणा घेऊन विदुषक आला आहे म्हणून.

दूत — (राजास) सरकार, विश्वपूरच्या महाराजाकडून विदुषक आला आहे व तो आपल्यास शुभवर्तमानाचा नजराणा घेऊन भेटीस आलों आहें म्हणून सांगतो.

सुहा० — (आनंदीत होऊन मनांत) काय त्याणें शुभवर्तमान आणलें असेल बरें! (दुतास) दुता, त्याला लवकर आंत घेऊन ये.

दूत — (विदुषकाकडे येऊन त्यास) अहो विदुषक महाराज, आपल्यास सरकार आंत बोलावताहेत.

विदु० — (मान हालवून) फार उत्तम. (असें म्हणून गायनमंदिरांत जातो.)

सुहा० — असें बसा महाराज. आपलें येणें कोणत्या उद्देशानें घडलें द्विजराज!

विदु० — राजा, तुझा जन्म सफळ झाल्याचें आनंददायक वर्तमानामृत तुला पाजण्याकरतां घडलें.

सुहा० — भट श्रेष्ठांनों, सांगा सांगा लवकर काय शुभवर्तमान असेल तें.

विदु० — भूपवर्या, तूं जी आज एक वर्ष घरांत कन्या पाळिलीस ती कोण ही तुला समजली कीं काय?

सुहा० — (रडूं लागतो.) द्विजोत्तमा, पाळिली मात्र मी पण तिचा शेवटीं एका जोग्यानें गंगेंत लोटून नाश केला!

विदु० — राजा, तो जोगी कोण तो तुला समजला काय?

सुहा० — नाहींरे बाबा. त्या पापिष्टाचें नांवसुद्धां माझ्यापुढें काढूं नको. त्याचें नांव काढलेंस म्हणजे माझ्या सर्वांगास दुःखानें घाम सुटतो.

विदु० — अरे, उगीच अशी गडबड काय करतोस! आधीं मी सांगतों तें ऐकून घे मग तुझें कांहीं बोलण्याचें राहिलें तर बोल.

सुहा० — बोला बोला महाराज, हे श्रवण आपलें बोलणें ऐकण्याकडेसच लागले आहेत.

विदु० — राजा, रत्नकांतेचा खून केला म्हणून ज्या जोग्यास तूं सुळावर देण्याची शिक्षा केलीस तो जोगी नव्हे तर तो तुझ्या पोटचा तुझाच पुत्र आहे.

सुहा० — (आश्चर्यांत पडतो.) द्विजश्रेष्ठ, खरोखरीच काय तो माझा पुत्र.

विदु० — होय. खरोखरच तो तुझा पुत्र. राजा, रत्नकांता ही तुझी सून.

सुहा० — देवा! हें जर खरें असेल तर त्या उभयतांचा माझ्याचकडून नाश झाल्यासारखें झालें. (सुहास्यराज रडूं लागतो.)

विदु० — राजा, तूं आतां मुळींच शोक करूं नको. अरे, ईश्वराचे कृपेनें सर्व सुखरूप आहेत.

सुहा० — द्विजोत्तमा, तुझ्या तोंडांत साखर पडो.

विदु० — भूपेंद्रा, बाळमित्र या नांवाचा तुझ्या नगरांत कोणी सावकाराचा कारटा आहे, त्याणें रत्नकांतेवरती पापनजर ठेविली व ज्या दिवशीं ती नाहींशी झाली त्या दिवशीं त्याणें तिला फसवून नंदन वनांत घेऊन जाऊन ती आपल्या मतास अनुसरण्यासाठीं त्याणें पुष्कळ प्रयत्न केले; पण ती महापतिव्रता त्याला दाद देईना.

सुहा० — अरे चांडाळा बाळमित्रा, तूं कर्म करून दुसऱ्यावर घातलेंस काय!

विदु० — राजा, मग ती आपल्या मतास अनुसरेना म्हणून त्याणें त्या नंदन वनांतील विवरांत रत्नकांतेला व तिच्या सखीला

रागानें कोंडून तुझ्याकडे आला आणि हें कर्म चंद्रमुखानें केलें असें बनावट तुला सांगून हा प्रसंग आणिला.

सुहा०— (रागानें) वाहवा रे दुष्टा, चांगलें कपट दाखविलेंस. चिंता नाहीं, त्याच सुळावरती तुला चढवितों.

विदु०— राजा, ज्या ठिकाणीं चंद्रमुखास सुळीं देत होते त्या ठिकाणीं तुझी पत्नी रतिप्रिया तुझ्या पुत्रसुनेसह व त्यांचें आजपर्यंत प्रतिपालनकर्ता बाप शौर्यसागर आपल्या कुटुंबासह - त्या ठिकाणीं आहे यासाठीं तूं आपल्या धर्मशील पुत्रस्नुषेसहित पत्नीची त्वकर जाऊन भेट घे.

सुहा०— आज्ञा द्विजेंद्रा. (प्रधानास) प्रधानजी, सर्व सेना व उत्तम वहानें आणि शौर्यसागर महाराजांसाठीं सुखासन घेऊन जाऊन त्यांस मोठ्या दिवाणखान्यांत घेऊन या.

(सुहास्यराज मोठ्या दिवाणखान्यांतजातो.)

प्रवेश ५.

रत्नपूर नगर.

मोठा दिवाणखाना.

(शौर्यसागर, सुशिलाबाई, रतिप्रिया, चंद्रमुख, रत्नकांता, सुहास्यराज, प्रधान व सेवक प्रवेश करितात.)

सुहा०— (शौर्यसागरास सिंहासनावर बसवितो.)

(चंद्रमुख सूर्यकांतास मांडीवर घेतो. सुशिला बाई रत्नकांतेस मांडीवर घेते. रतिप्रिया शौर्यसागरास नमस्कार करिते.)

शौर्य०— (सुहास्यराजास) राजा, सांगतों ऐक.

श्लोक.

स्त्री ही आजवरी त्वदीय प्रितिनें रक्षीयली मी घरीं॥
पौत्रापुत्रसहीत आज तुमच्या देतों स्वयें ह्या करीं
होती भोगुनियां सदैव असुखें आतां सुखें द्यावया
तुम्ही पात्र असा तसेच पदरीं मालें त्वरें घ्यावया ॥

सुहास्यराज, मी माझ्या सर्व राज्याचा राज्याभिषेक चंद्रमु-

खास केलेलाच आहे. तेव्हां जो माझा पुत्र तोच तुमचा.

सुहा०— शौर्यसागरजी, चंद्रमुख हा झाला मात्र मला पण आजवर त्याचें लालनपालन करून वाढविला तो पुत्र माझ्यासह तुमचाच आहे.

(नारद प्रवेश करितो.)

पद.

(हरिभजनावीण काळ० याचालीं.)

सदय प्रभो असति कुठें नकळे हें मला ॥ ध्रु०॥
सांपडसी कवण्या पायीं॥ दर्शन तव कैसें होई॥
आशा माझी चरणठायीं॥ ध्यास लागला ॥१॥
शरण कसें यावें तुला॥ सेवा तुझी घडेल याला॥
विचार कांहीं नसुचे मला॥ शोष खुंटला ॥२॥
नेणतसें या जगातें ॥ नाना शास्त्रें नाना मतें ॥
नाना धर्म नाना वृतें ॥ मिति न तीर्थाला ॥३॥
विचारांतिं माझि मती॥ गुंग होउनि गेलि अती॥
शास्त्रांसीहि पडलि भ्रांती॥ नाहिं थांगला ॥४॥

(सर्वत्र नारद स्वामीस नमस्कार करितात.)

नारद— (हंसत सुहास्यराजास) भूपश्रेष्टा, अरे तूं मोठा भाग्यवंत आहेस. राजा, तुला पुत्रस्नुषेसह एकत्र बघून मला मोठा आनंद वाटतो. अरे, तुझा हा पुत्र चंद्रमुख मोठमोठ्या जिवापलिकडील संकटांतून वांचून आपल्या मातोश्री व पुत्रस्त्रीसहित सोळा वर्षांनीं एकदम भेटला हा अलभ्य लाभ एक तुला शौर्यसागराच्या सद्वर्तनानें मिळाला. या तुझ्या स्त्रियेचें व चंद्रमुखाचें पालन पोषण याणें केलें असें कीं तसें तुझ्या हातून सुद्धां झालें नसतें. तर तुला हा अति सुखाचा दिवस फक्त शौर्यसागरापासून आला.

सुहा०— होय महाराज खरेंच आहे. यांचे उपकार माझ्या हातून काळांतींही फिटणार नाहींत.

शौर्य०— मुनिश्रेष्ट, ईश्वर इच्छेनें सर्व गोष्टी घडून येणार; आम्हां मनुष्यांकडे काय आहे?

सुहा०— स्वामी महाराज, ही माझी प्रिया देवीचे पुजेस गेली तिकडे कोणी वैराग्यानें हिला अरण्यांत नेऊन सोडिली इथ-पर्यंत याजबद्दल आम्हांला खबर समजली. पुढें ही माझी प्रिया कोठें आहे याचा मी अनेक प्रकारांनी शोध केला पण थांग लागला नाहीं. आपण सर्वनियंते अहां म्हणून प्रार्थ-ना करितों. तरी कृपा करून हा प्रकार कसा झाला तें सांगा-वें.

नारद:— (हंसत) सांगतों ऐक.

दिंडी.

ऐक राया तूं करुनि चित्त स्थीर ॥
हिच्या सवतीचें कृत्य असे घोर ॥
भीमरावासी धरुनि साह्यतेला ॥
केला युक्तीनें उभयतांनिं घाला ॥

राजा, घरांतल्या घरांतच हा सर्व व्यवहार घडलेला आहे.

सुहा०— (संतप्त होऊन) मुनिवर्य काय सांगूं? त्या उभयतां-चा मला इतका राग आला आहे कीं केव्हां एकदां त्यांची धडें शिराविरहित पाहीन. (प्रधानास) प्रधानजी, तु-म्ही आतांच जाऊन त्या कंवटाळिणीस व भीमरावास श-हराबाहेरील मैदानांत तोफेच्या तोंडीं द्या व बाळमित्रास शहरांतील मध्यभागांत डोकें वरती ठेवून गाडा, आणि त्या-चा प्राण जाईपर्यंत त्याच्या मस्तकावर पलित्ते ठेवा.

नारद:— राजा, स्थिर हो स्थिर हो. असें करणें तुझ्या थोरप-णास अतिशय लांछनास्पद आहे. जरी त्यांणीं त्या वेळीं हें अघोर कृत्य केलें तरी त्या त्रिवर्गास मोठा पश्चात्ताप झा-ला आहे. आणि ज्याला पश्चात्ताप घडला त्याला शिक्षा क-रणें धर्मनीतींत अगदीं गैर मानलें आहे यासाठीं त्या त्रि-वर्गाला झालेल्या पश्चात्तापाबद्दल खात्री करून घेऊन मा-फी कर.

सुहा०— स्वामी महाराज, आपल्या आज्ञेपुढें आमचा इलाज ना-हीं. परंतु ज्याणें इतकें घोर कृत्य केलें त्या पापाचें त्यांना

प्रायश्चित मिळणें जरूर होतें. याउपर आपली मर्जी. (प्रधानास) जा त्या तिघांस इकडे घेऊन या.

नारद:— राजा, मदनमंजरीस राजरीती प्रमाणें घेऊन येण्याची आज्ञा कर.

प्रधा०— आज्ञा मुनिवर्य. (प्रधान मदनमंजरीस घेऊन येतो.

मदन०— अरेरे! काय मी पापीण व्यर्थ रतिप्रियेचा नाश करून पश्चात्तापाला पावलें! ती मला बहिणी प्रमाणें मानीत होती.

पद.

(ज्यावरि मी विश्वास ठेविला याचाली०)

मजवरि तीणें भार वाहिला॥ परि मी तीचा घात करविला
भगिनीवत मानी जी मजला॥ छळिली ती अबला॥

यावेळीं जर माझा प्राणनाथ वध करितील तर चांगलें होईल.

(मागील पद पुढें चालू.)

योग्य मी आहें आत्मवधाला॥ पापिण चांडाळिण घाताला
हरिल भूपती जरि प्राणाला॥ मग उपकार चि झाला॥

नारद:— ऐकलेंस काय राजा, काय म्हणत आहे ती! अरे, शेंकडों ब्रम्हहत्या करून जर प्राणी पश्चात्तापाला पावतो तर त्याला परमेश्वर आपल्या पदावर नेऊन बसवितो. म्हणून आतां तिच्यावरचा राग टाकून तिचें शांतवन कर.

(सुहास्यराज मदनमंजरीस हातास धरून बसवितो.)

मदन०— प्राणनाथ, मी कैकईनें जें कुकर्म केलें त्याचें प्रायश्चित ' मला लवकर द्या.

सुहा०— झाल्या गोष्टीला इलाज नाहीं. पण यानंतर आपल्या बुद्धीचा अशा प्रकारें उपयोग करीत जाऊं नको.

(कोतवाल बाळमित्रास व भीमरावास घेऊन येतो.)

सुहा०— [illegible], तुम्हांस अशीं घोर कृत्यें करण्यास शरम [illegible]

[illegible] आम्हांस त्या केले-
[illegible] आहे यासाठीं लवकर-

शिक्षा देऊन या देहाचा शेवट करा.

सुहा०— नारदस्वामींचे आज्ञेवरून मी तुम्हांस तुमच्या कृत्याची माफी केली आहे. यानंतर तुम्ही असें घोर कृत्य करण्याचें मनांतसुद्धां आणूं नका.

नारद:— शौर्यसागरानें चंद्रमुखास राज्याभिषेक केलेलाच आहे तसा तूंही सर्व राज्यकारभार चंद्रमुखावर संपवून तुमची उभयतांची इच्छा असली तर आपल्या स्त्रियासहित माझेबरोबर तपश्चर्येसाठीं बद्रिकाश्रमास चला.

सुहा:— सुधारसाचा कुंभ टाकून उदककलशाची इच्छा कोण करील? महाराज, माझीही इच्छा तीच आहे.

शौर्य०— (सुहास्यराजास) रत्नकांतेच्या माहेरीं हें सर्व वर्तमान कळविण्यासाठीं आतांच जासूद पाठवून द्या.

(सुहास्यराजानें लागलीच शिक्केकटार चंद्रमुखाचे स्वाधीन केली व रत्नपुरी व विश्वपुरी हीं दोन्ही राज्यें एकत्र करून चंद्रमुख राज्यकारभार पाहूं लागला.)

नारद:— (चंद्रमुखास) तूं आपल्या दोन्ही राज्यांचा उपभोग आनंदानें भोगून पुत्र सूर्यकांतास राज्यावर बसवून तूं श्रीपदीं पावशील. आणखी कांहीं इच्छित असेल तर माग.

चंद्र०— स्वामी महाराज, आपल्या आशिर्वादानें माझे सर्व हेतु पूर्ण झाले व होतील. आतां आपण देतां तर हें भरतवाक्य द्या.

श्लोक.

वेळीं वृष्टि असो बहू पिक पिको सद्धर्म तो आवडो ॥
कोणा क्लेश नसो प्रजा सुखि वसो कूकर्म तें नावडो ॥
रोगां मार्ग खुटो द्रारिद्र्यही हटो देशांतुनी सर्वही
भक्तीसाठिं झटो मनांत लगटो पादांबुजें प्रत्यहीं ॥

नारद:— तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व घडेल.

पडदा पडतो.

समाप्त.

ग्रंथकर्त्याची प्रार्थना.

पद.

(सुंदर सुख. या चाली.)

भस्मभुषित्त सकल आंगिं अग्निकूमरा ॥
हरिहरविधि करुणानिधि वास उदुंबरा ॥ धृ० ॥
दत्तात्रय नामस्मरणिं तारि पामरा ॥
दुष्टांसी दंड करुनि रक्षितो बरा ॥
पापलया नेइ जसें अग्नि कर्पुरा ॥
तोहा पहा गुरुहा नरसिंहपुरिं संगमतिरिं घाटा-
वरि शोभतो हिरा ॥ भस्म० ॥१॥
पापताप हरण करी नेत्र दर्शनीं ॥
कामरहित भक्ति करि त्यां ने स्वभूवनीं ॥
रजकाला सूखविलें राज्य अर्पुनी ॥
शेवटीं संकटीं दुर्घटीं धरुनि चरण करुनि स्म-
रण जावें शरण त्याचि यतिवरा ॥ भस्म० ॥ २
नारायणसूत चरणिं विनंती करी ॥
पायांची भेट गुरू देइं लौकरी ॥
इच्छा मम हेचि असे पूर्ण ती करीं ॥
चिंतीं प्रीतीं अंतीं मस्तकिं कर अर्पण कर दि-
न सत्वर नेइं पदधरा ॥ भस्म० ॥ ३ ॥

पद.

(अष्ट मूर्ती परमेश सदाशिव. या चाली.)

तीन मूर्ति यति वेषि गुरुवर दुःख सर्व पळवो ॥
तद्रूपाविण वाव नसे हा निश्चय मनिं चढवो ॥ धृ०

सकल जनांचा इच्छित हेतू सर्वहि तो पुरवो ॥
दीर्घ संकटीं पावुनि आम्हां आपपदीं नेवो ॥
प्रपंच रहाटीं असतां गुरु तो कुठेंचि ना अडवो ॥
नारायणसुत विनवी द्वैतभाव सर्व गळवो ॥तीन०॥१

पद.

(तुम्हा तो शंकर सुखकर या चाली.)

जनांचें इच्छीत इश पुरवो ॥
मुनिजनसुख सकट दर्शनीं जनतिहीं, विकळही,
सकळही, तो अही, जळमही, करुनिमगसर्वत्ररचि-
तो ॥ इच्छीत० ॥ ध्रु० ॥
नारदानि मुनिजना सुखवुनी, देता, घेता, सदया ॥
ठेवुनी, तन्मनीं, तुंदवदनिं ॥ सुसुंदरानयनीं ॥
ठेविशी शिव विष्णु तूं चरणीं ॥ मुनिवरांत शिरोमणी ॥
दास निश्चल कडकडुनि ॥ जोडि उभय हस्त तो ॥ १ ॥

संगीतरत्नकांतानाटकसमाप्त.